पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

गुरुवार, दि. १२ जून २०२५ | वर्ष : १३ | अंक : १५६ | पाने ८ | किंमत २ रुपये

www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ स्कूल बस नियमावलीचे काटेकोरपणे पालन व्हावे

४ बस स्थानकावर चोरी करणा-या महिलेच्या ताब्यातुन सोने हस्तगत

५ वाहनांना एचएसआरपी बसवून घेण्याचे आवाहन



पान ८ वर..

# १० वर्षांत जुन्या बसेस जाणार, डेपोंचाही कायापालट; परिवहन मंत्र्यांची घोषणा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : महाराष्ट्राच्या परिवहन खात्यातील (एसटी) सर्व बसेस इलेक्ट्रीक करणार असून पुढील १० वर्षात जुन्या एसटी बसेस टप्प्याटप्प्याने बंद केल्या जातील आणि त्या जागी नवीन बसेस येतील, अशी घोषणा राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. तसेच राज्यातील सर्व एसटी बस आणि डेपो अद्यावत करण्याचे काम दोन महिन्यात सुरू होणार असून सुरक्षा आणि स्वच्छता याचा विचार करून काम केले जाईल, असे आश्वासन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

प्रताप सरनाईक हे बुधवारी कार्यक्रमानिमित्त पुण्यात होते. माध्यमांशी संवाद साधताना सरनाईक यांनी एसटीच्या विकासाचा प्लॅनच मांडला. एसटी खात्यात ५ हजार बस घेणार असून, त्यापैकी एक हजार बस या इलेक्ट्रिक घेण्याचे संकेत त्यांनी दिले. पुढील काही वर्षात एसटीच्या सर्व बसेस इलेक्ट्रिक असतील. २०२९ पर्यंत ताफ्यात २५ हजार बसेस दाखल होणार आहेत, असं त्यांनी सांगितले.

मंत्री सरनाईक यांनी या स्मार्ट बसमध्ये सर्व आवश्यक



सेवा-सुविधा आणि सुरक्षितता यंत्रणा असतील असे स्पष्ट केले. स्वारगेट घटनेच्या पार्श्वभूमीवर, बाहेरील व्यक्ती बसमध्ये सहजपणे प्रवेश करू शकणार नाहीत, अशी यंत्रणा बसमध्ये असावी, यावर त्यांनी भर दिला. आग किंवा इतर घटना घडल्यास तातडीने प्रतिसाद देणारी यंत्रणा बसमध्ये असणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

एसटी महामंडळाला सध्या ११ हजार कोटींचा संचित तोटा असून, यावर श्वेतपत्रिका काढणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. जुन्या चुका सुधारून नव्या पद्धतीने काम सुरू केले जाईल, मात्र या सुधारणा लगेच न होता, पुढील अडीच वर्षांत हळूहळू होतील असे त्यांनी स्पष्ट केले.

बसेस लिझवर न देता, काही ठिकाणी त्या तयार करून घेतल्या जातील आणि त्यांची मालकी एसटी महामंडळाकडेच राहील, असेही मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेतील मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली असतानाच शिंदेचे निकटवर्तीय आणि त्यांच्याच बालेकिल्ल्यातून निवडून येणारे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या विधानाची राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे . परिवहन खात्याला अजित पवार सढळ हाताने निधी देत आहेत. महायुतीत कोणतीही नाराजी नाही, असं प्रताप सरनाईकांनी सांगितलं . कदाचित मी जुना सहकारी असल्याने निधीची अडचण येत नाही. इतर खात्यांबद्दल मला माहित नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. महायुतीत कोणतीही नाराजी नसून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील महायुतीचा निर्णय हे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री घेतील, असा पुनरुच्चार त्यांनी केला.

# दुचाकीवरून जाणाऱ्या महिलेला ट्रकने चिरडले; महिलेचा जागीच मृत्यू

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : भरधाव ट्रकच्या धडकेत दुचाकीवरून जाणाऱ्या महिलेचा जागीच मृत्यू झाला असून दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. हि घटना मार्केट यार्ड मधील गंगाधाम चौकात आज (११ जून ) बुधवारी सकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, दिपाली सोनी वय २९ असं मृत्यू झालेल्या महिलेचं नाव असून दुचाकीस्वार जगदीश पन्नालाल सोनी वय ६१ वर्ष असं जखमीचे नाव आहे. या अपघात प्रकरणी मार्केट यार्ड पोलिसांनी ट्रक चालक शौकत अली पापालाल कुलकुंडी (वय ५१ राहणार भवानी पेठ ) यास ताब्यात घेतले असून त्याची वैद्यकीय तपासणी केली जात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्केट यार्ड गंगाधाम या अत्यंत रहदारीच्या मार्गावरुन जगदीश आणि दीपाली दोघेजण दुचाकीवरून जात होते. गंगाधाम चौकात आल्या नंतर सिग्नल सुटल्यावर पाठीमागून आलेल्या ट्रकने दुचाकीला धडक देत पुढे फरफटत नेले यामध्ये महिलेच्या अंगावरून ट्रकचे चाक गेल्याने तिचा जागीच मृत्यू झाला असून दुचाकीस्वार पन्नालाल हे गंभीर जखमी झाले आहेत. जखमी पन्नालालला रुग्णालयात नेण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर आहे.

दरम्यान, गंगाधाम चौकात कायम अपघात होत असतात. अपघात झाला की तात्पुरती जड वाहनांना बंदी घालण्यात येते. गंगाधाम चौकाकडे जाणाऱ्या बिबवेवाडी कोंढवा रस्त्यावर पायाभूत सुविधांची वानवा आहे. महापालिकेने 'आई माता मंदिर' आणि गंगाधाम चौक दरम्यानच्या उतारात बदल करण्याची योजना जाहीर केली आहे. हा उतार कमी करून स्पीड बंप आणि रॅम्बल स्ट्रिप्स बसवले जात आहेत. रस्ता रुंदीकरणासाठी अतिक्रमणे हटविली गेली पाहिजेत. या रस्त्यावर दिवसा जड वाहनांना कायमस्वरूपी बंदी घालण्यात यावी, अशी मागणी स्थानिक रहिवासी अतुल जैन व अमोल परदेशी यांनी केली आहे.

## संक्षिप्त

### पश्चिम रेल्वेची वाहतूक विस्कळीत, माहिम स्थानकात पॉइंट बिघाड

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई :मुंबईच्या पश्चिम रेल्वे मार्गावर जलद लोकल तब्बल १५ ते २० मिनिटं उशीराने धावत आहेत. माहिम स्थानकात पॉईट बिघाड झाल्यानं दादर ते अंधेरी आणि अंधेरी ते दादर अशा दोन्ही बाजूंच्या जलद मार्गावरील लोकल यामुळे रखडल्या आहेत. वांद्रे आणि खार स्थानकादरम्यान तीन लोकल एकामागोमाग एक उभ्या होत्या, पश्चिम रेल्वेवरील या तांत्रिक बिघाडामुळे मुंबईकर चाकरमान्यांना ऑफिसमध्ये लेटमार्कला सामोरे जावे लागले. हार्बर मार्गावरील लोकलसेवा तांत्रिक बिघाडामुळे विस्कळीत झाली होती. त्यामुळे प्रवाशांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागला होता. तर मध्य रेल्वेवर दोनच दिवसांपूर्वी लोकलमधील गर्दीमुळे दुर्देवी घटना घडली होती. दोन लोकलमधील दरवाजावर लटकलेले प्रवासी एकमेकांना घासले गेल्याने १० ते १२ प्रवासी धावत्या लोकलमधून खाली पडले होते. यात ६ जणांचा मृत्यू झाला तर इतर जखमी झाले. या घटनेनंतर मध्य रेल्वे प्रशासनाकडून काही महत्वाचे निर्णय घेतले गेलेत. ही घटना ताजी असतानाच पश्चिम रेल्वे मार्गावरील लोकलसेवेत तांत्रिक बिघाडाला प्रवाशांना सामोरे जावे लागले .

### अलमट्टीच्या उंचीविरोधात जोरदार लढा : मंत्री विखे- पाटील

जनप्रवास । प्रतिनिधी

कोल्हापूर : अलमट्टी धरणाची उंची वाढू नये याकरिता राज्य शासन सर्व बाजुंनी प्रयत्न करत असल्याचे राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी कोल्हापूर विमानतळावर सांगितले. अलमट्टी धरणाची उंची वाढली तर कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात दरवर्षी महापुराची स्थिती निर्माण होणार आहे, त्यामुळे या दोन्ही जिल्ह्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. यामुळे अलमट्टी धरणाची उंची वाढवण्यास या दोन्ही जिल्ह्यातून तीव्र विरोध होत आहे. राज्य शासनाही धरणाची उंची वाढवण्यास विरोध केला आहे.

# निलेश चव्हाणसह शशांक हगवणेला १४ जूनपर्यंत पोलिस कोठडी

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरण!

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणातील सहआरोपी निलेश चव्हाणला १४ जून पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. वारजे पोलीस स्टेशनमध्ये असलेल्या गुन्ह्याप्रकरणी ही पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. निलेश चव्हाण याच्यावर वारजे पोलीस स्टेशनमध्ये कस्पटे कुटुंबीयांना धमकवल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. तर शशांक हगवणेला देखील १४ जून पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. खोटे कागदपत्र सादर करत शस्त्र परवाना मिळवल्या प्रकरणी शशांक हगवणे याच्यावर वारजे पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वैष्णवीचा नवरा शशांक आणि दीर सुशील यांनी चुकीचे पत्ते देऊन शस्त्र परवाना मिळवल्याबद्दल शशांक हगवणे याच्याविरोधात वारजे तर सुशील हगवणे कोथरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हगवणे कुटुंबीय पुणे ग्रामीणमधील पौड पोलीस स्टेशनच्या हद्दीत राहतात. त्यामुळं त्यांनी २०२२ मध्ये पुणे ग्रामीण पोलीसांकडे बंदुकीच्या परवान्यासाठी अर्ज केला होता. मात्र, पुणे ग्रामीण पोलीसांनी दोघांचेही अर्ज फेटाळून लावले होते. त्यानंतर दोघांनी ते पुणे शहरात राहत असल्याचे खोटे पत्ते दिले. याप्रकरणी दोघां भावांवरती गुन्हा दाखल आहे.

# पुण्यातही एक सदस्यीय प्रभाग करा, चार सदस्य नकोत

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : मुंबई प्रमाणेच पुण्यातही एक सदस्यीय प्रभागरचना व्हावी. जर चार सदस्यीय प्रभाग रचना आमच्यावर लादली तर आम्ही या निर्णयाविरोधात कोर्टात जाऊ, असा इशारा उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहराध्यक्ष संजय मोरे यांनी दिला. त्यासोबतच पुण्यातील काँग्रेसने देखील या चार सदस्य प्रभाग रचनेला विरोध केला.

चार सदस्यीय प्रभाग हे महानगरपालिकेमध्ये योग्य नाही. त्याच्या बदल्यात एक सदस्यीय

### नव्या प्रभाग रचनेला ठाकरे सेना आणि काँग्रेसचा विरोध



प्रभाग केला पाहिजे. असं केल्यास नगरसेवकाला नीट काम करता येते. भारतीय जनता पक्षाला फक्त सत्ता भोगायची आहे. नागरिकांच्या समस्यांवर त्यांना काम करायचं नाही. आमचा या निर्णयाला विरोध आहे. भारतीय जनता पार्टी मात्र नेहमीप्रमाणे यावेळीही रडीचा डाव खेळणार असं काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी म्हटलंय.

राज्यातील महापालिका निवडणुकीच्या प्रभाग रचनेचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामध्ये पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, वसई विरार, छत्रपती संभाजीनगर आणि कल्याण डोंबिवलीसारख्या महापालिकांचा समावेश आहे.

मुंबई महापालिकेमध्ये जुनेच २२७ प्रभाग कायम असून त्या ठिकाणी एक सदस्यीय प्रभाग असणार आहेत. त्याव्यतिरिक्त राज्यातील इतर महापालिकांमध्ये तीन ते चार सदस्यीय प्रभाग असणार आहेत. पुण्यामध्येही बहुसदस्यीय प्रभाग असणार आहेत. पुण्यामध्ये १६२ नगरसेवक असणार आहेत. त्या हिशोबाने प्रभाग रचना करण्यात येणार आहे.

# नऱ्हेमध्ये सोसायटीतील सात दुचाकी पेटविल्या

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : सोसायटीच्या आवारातील सात दुचाकी ज्वलनशील पदार्थ टाकून पेटवून दिल्याची घटना सोमवारी पहाटे घडली. सिंहगड रस्ता परिसरातील नऱ्हे भागात ही घटना घडली. याबाबत सागर पहलाज ललवाणी (वय ३२) यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ललवाणी हे नऱ्हे परिसरातील सिद्धेश्वर हाऊसिंग सोसायटीत राहायला आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोसायटीच्या आवारात लावलेल्या दुचाकींना सोमवारी पहाटे आग लागल्याचे रहिवाशांच्या निदर्शनास आले. रहिवाशांनी या घटनेची माहिती अग्निशमन दलाला दिली. जवान घटनास्थळी पोहोचेपर्यंत रहिवाशांनी पाणी ओतून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. या घटनेत सात दुचाकी जळाल्या आहेत.

# पिंपरी-चिंचवड शहरातील प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे गरजेचे

### महापालिका आयुक्त शेखर सिंह यांचे मत

**जनप्रवास । प्रतिनिधी**



पिंपरी : पिंपरी-चिंचवडसारख्या वेगाने विकसित होणाऱ्या औद्योगिक शहरामध्ये प्रदूषणाच्या समस्येवर प्रभावी नियंत्रण ठेवणे ही काळाची गरज आहे. लो इमिशन झोन्स'सारख्या संकल्पना केवळ पर्यावरणपूरक नसून, त्या शाश्वत नागरी जीवनशैलीच्या दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

वाहतूक क्षेत्रातील वाहनांमुळे होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि हरित उपक्रमांना चालना देण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका आणि ब्रिटिश उच्च उपायुक्त मुंबई तसेच ट्रान्सपोर्ट फॉर लंडन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेचा समारोप आयुक्त सिंह यांच्या प्रमुख उपस्थित झाला, यावेळी ते बोलत होते.

आयुक्त सिंह म्हणाले, या कार्यशाळेच्या माध्यमातून तांत्रिक सुसज्जता, सामाजिक सहभाग आणि प्रशासकीय समन्वय या तिन्ही पैलूंवर विचारमंथन झाले. चर्चेतील निष्कर्ष हे शहराच्या प्रदूषण नियंत्रण धोरणांना अधिक बळकट करतील. हवेतील प्रदूषणाचे कमी उत्सर्जन क्षेत्रे योजनेचे नियोजन करताना त्यामध्ये विविध घटकांचा, विभागाचा सहभाग कसा सुनिश्चित करायचा, यावर चर्चा झाली.

# शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीचे आमिष; व्यावसायिकाची ४७ लाखांची फसवणूक

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : पुण्यातील एका ४१ वर्षीय व्यक्तीला सायबर चोरट्यांनी शेअर ट्रेडिंगच्या बहाण्याने ४७ लाख ६८ हजार रुपयांचा ऑनलाइन गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी कोथरुड पोलीस ठाण्यात अक्षय राजन जोशी (य- ४१, रा. गांधीभवन, कोथरुड, पुणे) यांनी आरोपी अक्षया व अनोळखी मोबाईल क्रमांक धारक व बँक खातेधारक विरोधात तक्रार दाखल केली आहे.

अक्षय राजन हे खासगी कंपनीत नोकरी करत असून त्यांचा अनोळखी सायबर चोरटी अक्षया हिने फोन करुन संर्पक करत विश्वास संपादन केला. त्यांना शेअर ट्रेडिंग मध्ये गुंतवणुक केल्यास अल्पावधीत चांगल्याप्रकारे नफा मिळेल असे अमिष दाखविण्यात आले. त . अशाप्रकारे एकूण ४७ लाख ६८ हजार रुपये आरोपींनी घेऊन सदर रकमेचा कोणताही परतावा न देता आर्थिक फसवणुक केली आहे. याबाबत पुढील तपास पोलीस निरीक्षक विक्रमसिंह कदम करत आहे.

# मोबाइल हिसकावणाऱ्या चोरट्यांचा उच्छाद

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : डेक्कन जिमखाना परिसरात दुचाकीस्वार चोरट्यांनी पादचाऱ्यांकडील मोबाइल संच हिसकावून नेण्याच्या घटना घडल्या. घोले रस्ता, तसेच जंगली महाराज रस्त्यावर या घटना घडल्या.



घोले रस्त्यावर तरुणाचा ७० हजार रुपयांचा मोबाइल संच दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना रविवारी (९ जून) घडली. याबाबत एका तरुणाने डेक्कन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार तरुण पाषाण भागात राहायला आहे. रात्री तो घोले रस्त्यावरील एका हॉटेलमध्ये मित्रांबरोबर आला होता. मित्रांबरोबर जेवण करून रात्री साडेबाराच्या सुमारास तो हॉटेलमधून बाहेर पडला. घोले रस्त्यावर तो थांबला होता. त्या वेळी दुचाकीस्वार चोरट्यांनी तरुणाच्या हातातील ७० हजार रुपयांचा मोबाइल संच हिसकावून नेला. पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय सावंत तपास करत आहेत.

जंगली महाराज रस्त्यावर एका पादचारी तरुणाचा मोबाइल संच हिसकावून नेल्याची घटना शनिवारी (८ जून) घडली. याबाबत एका तरुणाने डेक्कन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार तरुण शनिवारी दुपारी दोनच्या सुमारास जंगली महाराज रस्त्याने निघाला होता. एका हॉटेलसमोर पादचारी तरुणाच्या हातातील १७ हजार रुपयांचा मोबाइल संच हिसकावून चोरटे पसार झाले. सहायक फौजदार करडे तपास करत आहेत.

मोबाइल हिसकाविणाऱ्या चोरट्यांचा माग काढण्यात येत असून, पोलिसांनी घोले रस्ता, जंगली महाराज रस्ता परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासासाठी ताब्यात घेतले आहे.

पुणे स्टेशन परिसरातील अलंकार चित्रपटगृह परिसरात एकाकडील मोबाइल संच दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना नुकतीच घडली. याबाबत एकाने बंडगार्डन पो-लीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार पिंपरी-चिंचवड परिसरातील वडमुखवाडीत राहायला आहेत. शनिवारी दुपारी ते अलंकार चित्रपटगृहाजवळ थांबले होते. त्या वेळी दुचाकीस्वार चोरट्यांनी त्यांच्या हातातील आठ हजारांचा मोबाइल संच हिसकावून नेला. पोलीस उपनिरीक्षक धीरज गुप्ता तपास करत आहेत.

### मुलीशी अश्लील कृत्य करणाऱ्या प्रशिक्षकास सक्तमजुरी

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : बालेवाडी भागातील एका नेमबाजी प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत असलेल्या बारा वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या प्रशिक्षकास विशेष न्यायाधीश आर. एन. हिवसे यांनी तीन वर्षे सक्तमजुरी आणि सात हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

रुद्रगौडा चनवीरगौडा पाटील (वय २८, रा. साई चौक, पाषाण, मूळ रा. बेळगाव, कर्नाटक) असे शिक्षा सुनावलेल्याचे नाव आहे. सरकारी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने शिक्षा सुनावली.

मोरेश्वर सभागृह
Nishigandha Banquets
17B/3 Near Joshi Railway Museum, Kothrud, Pune 411 038
020 25460269
+91 9156172004
info@moreshwarsabhagruha.com
www.moreshwarsabhagruha.com
Snehal Tamhankar | Swapnali Gokhale
(Amit Caterers)

# अग्रलेख : राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणाला तूर्तास स्वल्पविराम!

गेल्या काही महिन्यांपासून, खरे तर विधानसभा निवडणूक झाल्यापासूनच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा सुरू होती. दरम्यानच्या काळात त्यात फुटीनंतर विभागलेल्या एका राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष काका खा. शरद पवार आणि दुसऱ्या राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यात अनेकदा भेटीगाठी झाल्या. कौटुंबिक दुरावा दूर होऊन पुत्र जय पवार याच्या साखरपुड्याच्या कार्यक्रमात सर्वजच एकत्र आल्याने एकीचा गोडवा वाढू लागला होता. यात प्रामुख्याने पुण्याच्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या निमित्ताने होणाऱ्या बैठका चर्चेचा विशेष केंद्रबिंदू ठरत. त्यात एकमेकांशी चर्चा न करणारे काका-पुतणे शेजारी बसण्यापासून ते चर्चा करताना दिसल्याने एकत्रिकरणाची वाटचाल असल्याचे बोलले जात. एवढेच काय, तर या बैठकांनंतर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची अजितदादांसोबत बंद खोलीत चर्चा हे त्याला पुष्टी देणारे ठरत. त्यातच काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीच्या एकत्र येण्यासंदर्भात सुप्रिया सुळे निर्णय घेतील, असे विधान दस्तुरखुद्द शरद पवारांनीच केल्याने या वर्वेला अधिकच ऊत आला. पण दुसरीकडे अजित पवारांनी या चर्चा निव्वळ शरद पवारांचा पक्ष फुटीपासून रोखण्यासाठी घडविल्या जात असल्याचे सांगत अप्रत्यक्ष एकीला इन्कारच दर्शविला होता.

परंतु जाणते नेते असल्याने शरद पवार यांचे संकेत बाष्पळ ठरणार नाहीत, त्यामागे काही अर्थ आहे अशी आशा दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांना लागून राहिली होती. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापनदिन मेळाव्यात काही संकेत मिळू शकतात, अशी अटकळ बांधली जात होती. अर्थात मेळावा एकी न घडविणारा ठरलाच, दुसरीकडे दोन स्वतंत्र मेळावे झाले तरी एकमेकांवर कोणतीही टीका किंवा भाष्य झाले नाही. इकडे शरद पवारांनी आपल्या भाषणात विलीनीकरणाच्या संदर्भात चकार शब्दही काढला नाही, उलट राष्ट्रवादीत फूट पडेल असे वाटले नव्हते. परंतु फूट पडली, खंत व्यक्त केली. फूट पडली तरी विचारांशी निष्ठा असलेले लोक आजही आपल्यासोबत आहे. भूतकाळात असे प्रसंग आले होते, अनेक आमदार सोडून गेले. परंतु पुढच्या निवडणुकीत पुन्हा त्याच ताकदीने आपण उभे राहिलो. आताही परिस्थिती बदलू शकते. राष्ट्रवादी पक्ष पुन्हा उभारी घेऊ शकतो. निष्ठावान कार्यकर्त्यांच्या जोरावर आपण पुन्हा ताकदीने उभे राहू, असे सांगत शरद पवारांनी विलीनीकरणाच्या चर्चेला तूर्तास तरी पूर्णविराम दिल्याचे दिसते.

अर्थात हा पूर्णविराम आहे की स्वल्पविराम हे पुढच्या काळात स्पष्ट होईलचः परंतु सध्या तरी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आपल्या ताकदीवर लढविण्याचे शरद पवारांच्या राष्ट्रवादीने ठरविल्याचे दिसते. कदाचित या निवडणुकीत आपली ताकद दाखवून त्या ताकदीच्या जोरावर पुढच्या वाटाघाटीत आपल्या बाजूने बरेच काही घडवून आणण्याचा शरद पवारांचा हेतू असू शकतो, किंवा विधानसभा निवडणुकीत जे काही झाले तो केवळ एक अपघात होता, असे अपघात वारंवार होत नाहीत. सध्या राज्य सरकारच्या विरोधात जनमत दिसून येत आहे. त्याचा फायदा उचलत पक्षाची ताकद वाढवायची आणि खरी राष्ट्रवादी आपलीच असल्याचे जनसमर्थनाच्या जोरावर सिद्ध करायचे, असेही शरद पवारांच्या मनात असू शकते. त्यादृष्टीने पुन्हा नव्याने महाविकास आघाडीची मोट बांधण्याचे कामही ते करू शकतात.

एक मात्र निश्चित की सध्या तरी शरद पवारांनी दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चेला ब्रेक लावला आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेससाठी पुढच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अतिशय महत्त्वाच्या ठरणार आहेत. लोकसभा निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीने निर्विवाद आपले वर्चस्व सिद्ध केले होतेः परंतु विधानसभा निवडणुकीत अजित पवारांनी अनपेक्षितपणे मुसंडी मारली. त्यामुळे राष्ट्रवादीचा मतदार नेमका कुणाच्या बाजूचा याचा निकाल अनिर्णित राहिला. त्यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतरच राष्ट्रवादी काँग्रेसची पुढची वाटचाल दुभंगलेलीच राहील की एकत्र होईल, हे स्पष्ट होऊ शकते. अजित पवार सध्या सत्तेत आहेत, त्याचा फायदा त्यांना नक्कीच मिळेल, शिवाय शरद पवार अलीकडील काळात निवृत्तीची भाषा बोलत आहेत, सुप्रिया सुळेंकडे पक्षाचे नेतृत्व देण्याचे स्पष्ट संकेत त्यांनी आधीच दिले आहेत. त्यामुळे नाही म्हटले तरी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्याला अजितदादा की सुप्रियाताई यातून एकाची निवड भविष्यात करावी लागणार आहे.

सत्ता हाताशी असलेले अजितदादा की विरोधी बाकावरील सुप्रियाताई, मतदारसंघातले काम की वैचारिक निष्ठा, सत्तेची निवांत संगत की सतत कारवाईची टांगती तलवार अशा दुभंगात राष्ट्रवादीचे कार्यकर्ते, नेते अडळणार आहेतच. त्यांची हीच अडचण भविष्यात दोन्ही पक्षांमध्ये समेट घडवून आणण्यास कारणीभूत ठरू शकते. सध्याही आपल्या पक्षातील काही लोकांचा अजितदादांसोबत जाण्याचा आग्रह आहे, अशी स्पष्ट कबुली शरद पवारांनीच मागे दिली होती. या पृष्ठभूमीवर विलीनीकरणाच्या चर्चेला शरद पवारांनी पूर्णविराम दिला, असे म्हणण्याऐवजी स्वल्पविराम दिला असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. पुढच्या काही महिन्यात राज्यातील राजकीय परिस्थिती पाहून हा स्वल्पविराम हलकेच बाजूला काढण्याचे काम केले जाऊ शकते. अजून चार वर्षे विरोधी बाकावर बसण्याची तयारी पवार निष्ठांची नक्कीच असेलः परंतु त्यानंतर पुढची पाच वर्षे सत्तेत राहण्याची संधी मिळेलच याची शाश्वती काय, हा अस्वस्थ प्रश्न त्यांच्या निष्ठेला वारंवार धक्के देत आहे. त्यामुळे सध्या जरी 'लढेंगे और जितेंगे' असा नारा दिला जात असला तरी त्यात कधीही 'सब मिलकर' हा शब्द जोडला जाऊ शकतो. फक्त हे कधी हे येणारा काळच ठरवेल.

# अंतरंग

## महागाईचे दुष्टचक्र

सन १९७० ते ८० च्या दशकात महागाईविरोधात मोठी आंदोलने होत होती. राज्य शासनाला या आंदोलनांची दखल घ्यावी लागत असे. आंदोलकांसमोर जाताना लोकप्रतिनिधींची तारांबळ उडायची. एवढेच काय, तर लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीला सत्ताधाऱ्यांना त्याचे परिणाम भोगावे लागत असत. अर्थात त्यावेळी सामाजिक संघटना आणि त्यादृष्टीने कामगार, कष्टकऱ्यांच्या संघटना हे त्याचे केंद्रबिंदू असायचे. लोकांनाही त्यांचे मोठे पाठबळ मिळायचे. आता आधुनिकतेच्या नावावर आणि दडपशाही कार्यपद्धतीत अशा संघटना लोप पावल्या आहेत. दुसरीकडे लोकप्रतिनिधी आश्वासने पाळायचे सोडाच, निवडणूक बाजारू बनविल्याने जनतेलाही त्यांना जाब विचारणे मुश्किल झाले आहे. परिणामी काही संघटनांनी याबाबत आवाज उठविण्यासाठी आंदोलने केलीच तर आता लोकही आंदोलनात




फारसे सामील होत नाहीत. लेकांना महागाई जाणवते पण झळ पोहचत नाही. ही झळ फक्त शेतकरी, कष्टकरी, अल्पभूधारक, स्वयंरोजगार करणारे वा असंघटित मजूरवर्ग यांना जाणवते व ती महागाईचे चटके ही देते. परदेशातून आवश्यकतेपेक्षा जास्त पैसा उपलब्ध झाला आहे व तो शिक्षित तरूणांच्या खिशात खेळताना दिसतो. 'संघटित क्षेत्रातील लोक वाढीव महागाई भत्ता मिळत असल्याने अर्थिकदृष्ट्या सुरक्षित असतात पुरवठा मागणीच्या सिध्दांतावर दरवाढ कमी जास्त होते हा अर्थशास्त्राचा नियम आहे. मुंबई, कलकत्ता, बेंगलोर, अहमदाबाद, दिल्ली, पुणे या शहरात जागा, जमिन, फ्लॅट यांचे भाव गगनाला भिडले आहेत. भारतात येणाऱ्या विदेशी कंपन्या परदेशी माणसे आणि अमाप पैसा स्थानिक बाजारपेठातून मोठ्या प्रमाणावर दरवाढीस कारणीभूत ठरतो. महागाईचे दुसरे कारण भ्रष्ट्राचार होय. तो देशात सर्व स्तरावर पसरलेला आहे. विनासायास उपलब्ध होत असलेला पैसा साठेबाजीला मदत करतो. आपोआपच महागाई वाढते. अर्थ मंत्रालय व रिझर्व बँकेच्या धोरणाचा महागाई वाढीवर काही परिणाम होताना दिसत नाही. बहुराष्ट्रीय कंपन्याकडून शेतकरी, व्यापारी, जनसामान्यांची लूट होत आहे. पैशाची मुक्त व अनिर्बंधित आवक, भष्ट्राचाराने लोकांना मिळणारा जादा पैसा या दोन घटकामुळे महागाईच्या दुष्टचक्राला गति प्राप्त होते. त्यामुळे महागाई कमी होतच नाही.

त्यातच शेतीमाल हा ठराविक काळात उत्पादित होतो आणि त्याची मागणी वर्षभर सुरू असते. दुसरीकडे शेतकऱ्याला त्याच्या मालाचा हमीभाव मिळत नाही. त्याला स्वत:चा माल योग्य दराने विकण्याची व्यवस्थाही मिळत नाही. वास्तविक देशी-परदेशी कंपन्यांनी ऑनलाईन विक्री व्यवस्था आणल्यानंतर त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांकडून ग्राहकाला थेट शेतमाल विकत घेता येईल आणि दलालांची मधली साखळी संपेल, अशी आशा होती. मात्र अजूनही नाशवंत शेतमालासाठी पारंपरिक विक्री व्यवस्थेचाच शेतकऱ्यांना आधार घ्यावा लागतो. त्यामुळे एकीकडे शेतकऱ्याला उत्पादन खर्चाएवढाही मोबदला मिळत नाही. दुसरीकडे कृत्रिम साठेबाजीने महागाई निर्माण केली जाते. अर्थात या महागाईमुळे जनतेतून वाढता रोष कमी करण्यासाठी सरकार काही उपाययोजना आखण्याचा प्रयत्न करते. यात प्रामुख्याने महागाई नियंत्रणात आणण्याचा प्रमुख मार्ग म्हणजे आरबीआयला व्याजदर वाढवावे लागतात. ज्यामुळे गृहकर्ज, वाहनकर्ज आणि इतर सर्व प्रकारच्या कर्जासाठीचे व्याजदर वाढतात. परिणामी ग्राहकांची क्रयशक्ती कमी होऊन औद्योगिक उत्पादनांचीही मागणी कमी होते.याचा गुंतवणुकीवर वाईट परिणाम होतो. खासगी उद्योग महागड्या पतपुरवठ्यामुळे गुंतवणूक करण्यास राजी होत नाहीत. देशाचा आर्थिक विकास दर ज्यामुळे मंदावतो. एका बाजूला वाढती महागाई आणि दुसऱ्या बाजूला मंदावलेला आर्थिक विकास दर यांचा फटका गरीब-श्रीमंत, शहरी-ग्रामीण प्रत्येकालाच कमी-अधिक प्रमाणात बसतो. त्यामुळे महागाई रोखण्याचे उपाय तसे प्रभावी ठरत नाहीत.वाढती लोकसंख्या हीसुद्धा महागाईला जबाबदार आहे. नागरिकीकरणामुळे जनतेच्या समस्येत सतत भर पडत आहे. वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे त्यामुळे इंधनखर्च वाढत आहे. शेती क्षेत्राखालील वनासाठीचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी होत आहे. शेतीमालाचे उत्पन्न कमी झाल्याने जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढत आहेत. सर्वच क्षेत्रात उत्पादित वस्तू व सेवांचे दर वाढत असल्याने जनतेचे अंदाजपत्रक एखाद्या पत्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळत आहे. जीवनावश्यक वस्तूंची आयात व निर्यात वेळेत न झाल्याने त्याचा फटका टंचाईच्या स्वरूपात सामान्य माणसाला बसतो आहे. आता केंद्रशासनाने नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रम अंमलात आणला आहे. भय, भूक भ्रट्राचाराने महागाईचे दुष्टचक्र गतिमान झाले आहे. मात्र २०२५ चे नवीन अंदाजपत्रक जनतेला संजीवनी प्रदान करणारे आहे. अर्थसत्ता विरूध्द निसर्गसत्ता यामध्ये डिजीटल इकॉनॉमिच्या दिशेने भारताची वाटचाल होत आहे.

**- सी. बी. रानडे**

# राजकारण

# मुख्यमंत्री कोणाचा बाप नसतो; जनतेचा सेवक

### खा. नारायण राणेंनी पुत्र नितेशचे कान टोचले

तुमच्या मनात काहीही असेल, पण कुणाचाही बाप काढणं योग्य नाही, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी नितेश राणेंना खडसावलं होतं. त्यानंतर आता मुख्यमंत्री कोणाचा बाप नसतो, मी नितेशला समज दिलेय, असं म्हणत पिता व खा. नारायण राणेंनी पुत्र नितेश राणेंचे कान टोचले.

महायुतीमध्ये भाजपचा मुख्यमंत्री सगळ्यांचा बाप आहे, अशी टिप्पणी करुन वादाला तोंड फोडणारे राज्याचे मंत्री नितेश राणे यांना आता त्यांचे पिताश्री आणि माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनीच समज दिली आहे. मुख्यमंत्री कोणाचा बाप नसतो. मी नितेशला समज दिली आहे. मुख्यमंत्री हा जनतेचा सेवक असतो. मी मुख्यमंत्री असताना मी सांगायचो की, मला साहेब म्हणू नका सेवक म्हणा, अशा शब्दांत नारायण राणे यांनी नितेश राणे यांचे कान टोचले. ते आज (बुधवारी) धाराशिवमध्ये आले होते. तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतल्यानंतर नारायण राणे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

यावेळी नारायण राणे यांनी म्हटले की, कोणाचा निधी अडवणं हे चुकीचं आहे. त्याबाबतही मी सूचना देणार आहे, अशी भूमिका मांडत जिल्हा नियोजन समितीच्या निधीबाबतच्या नितेश राणे यांच्या वक्तव्यामुळे निर्माण झालेल्या वादावर राणेंनी पडदा टाकला. तसेच नारायण राणे यांनी पुन्हा एकदा मनसेचे नेते प्रकाश महाजन यांना लक्ष्य केले. प्रकाश महाजन हा मेंटल माणूस आहे. त्याच्याशी माझी तुलना का करता? मी दिल्लीला होतो आणि तो इकडे कुठे उभा राहातो क्रांती चौकात, त्याला भेटायला मी यायचं का?, अशा शब्दांत नारायण राणे यांनी



संताप व्यक्त केला. तसेच राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार आहेत की नाही, याबद्दल मला माहिती नाही. ते एकत्र आले तर चांगली गोष्ट आहे, असे नारायण राणे यांनी म्हटले.

ठाण्यात तीन हात नाका परिसरात ठाकरे गटाकडून नितेश राणे यांना डिवचणारा एक बॅनर लावण्यात आला होता. ठाकरे गटाचे सहप्रवक्ता तुषार रसाळ यांनी ठाण्यातील मुख्य रस्त्यावर एक भलामोठा बॅनर लावला होता. 'मी तुषार दिलीप रसाळ... दिलीप पंढरीनाथ रसाळ हे माझे जन्मदाता (बाप). श्री. देवेंद्र गंगाधर फडणवीस हे माझे बाप नाहीत, असा मजकूर या बॅनरवर लिहला होता. या बॅनरचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. त्यानंतर ठाणे महानगरपालिकेने हा बॅनर उतरवला.

नितेश राणे यांनी अलीकडेच धाराशिव येथील कार्यक्रमात त्यांच्या नेहमीच्या शैलीत भाषण केले होते. कुणी कितीही ताकद दाखवली, कसेही नाचलं तरी सगळ्यांचा बाप म्हणून भारतीय जनता पार्टीचा मुख्यमंत्री बसलाय हे लक्षात ठेवा, असा दमच नितेश राणेंनी दिला होता. यावरुन शिंदे गटाचे आमदार निलेश राणे यांनीही नाराजी व्यक्त केली होती. त्यावर त्यांनी बंधू नितेश यांना चांगलेच सुनावले होते. त्यांनी आपल्या वक्तव्यांमुळे कोणाचा फायदा होतो, याचे भान ठेवा, असा सल्ला निलेश राणे यांनी आपल्या भावाला दिला होता. परंतु, नंतर निलेश राणे यांनी हे ट्विट डिलिट केले होते.

### कुणाचा बाप काढणे योग्य नाही...!

भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे हे आपल्या वादग्रस्त वक्तव्यावरुन मुख्यमंत्र्यांना अडचणीत आणत असल्याचं वारंवार दिसून येतं. यापूर्वी नागपूर येथील हिंसाचारानंतर मुख्यमंत्र्यांनी नितेश राणेंना समज दिली होती. त्यानंतर नितेश राणे यांनी धाराशिव येथील संवाद मेळाव्यात स्थानिक शिवसेना नेत्यांना उद्देशून बोलताना भाजपचा मुख्यमंत्री सगळ्यांचा बाप बसलेला आहे, असे वक्तव्य केलं होतं. त्यावरून शिंदे गटाने काल मंत्रिमंडळ बैठकीतही नाराजी व्यक्त केली होती. आमचा बाप बाळासाहेब ठाकरे आहेत, तुमचा कोण?, असा सवाल शिवसेनेच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत केला. त्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील नितेश राणे यांच्याकडे नाराजी व्यक्त केली. या प्रकारचे बोलणे टाळले पाहिजे, असा सल्लाही देवेंद्र फडणवीस यांनी नितेश राणेंना दिला. कुणाचाही बाप काढणं योग्य नाही, संबंधित मंत्र्यांशी मी बोललो. त्यांचा बोलण्याचा तसा अर्थ नव्हता. तरीही मी त्यांना सांगितलं, तुमच्या मनात जो काही अर्थ असेल त्यापेक्षा जे परसेप्शन जातं ते राजकारणात महत्त्वाचं असतं, असेही बजावल्याचे देवेंद्र फडणवीसांनी सांगितले आहे.

## पंचांग

विक्रम संवत्- २०८१ ज्येष्ठ शके संवत्- १९४७ संवत्सर - विश्वावसूनाम अयन- उत्तरायण मास- ज्येष्ठ ऋतु- सौर ग्रीष्म कृष्ण पक्ष तिथि : प्रतिपदा १४:२८:०५ नक्षत्र : मूल २१:५६:५७ योग : शुभ १४:०४:३५ करण : कौलव १४:२८:०५
करण:तैतिल २६:५६:३२+ सूर्य : वृषभ चन्द्र : धनु
हिजरी सन् - १४४६ मुस्लिम मास - जिल्हेज तारीख - १५ विशेष गुरू हरगोविंदसिंह जयंती

## राशी भविष्य...

**मेष** – आपल्या कामाचे प्रतिफळ ताबडतोब मिळेल. कार्याचा विस्तार वाढून अनकूल परिस्थिती निर्माण होईल. काही महत्वपूर्ण निर्णय घ्याल. कोणाचाही राग करू नका.

**वृषभ** – कौटुंबिक किंवा मालमत्तेविषयीच्या समस्या दूर होतील. पराक्रमामुळे विरोधक त्रस्त होतील. कर्ज घेण्यापासून दूर रहा. वहान चालवताना सावधानी बाळगा.

**मिथून** – मनात अशांती असल्याकारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नोकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा. आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.

**कर्क** – वादविवाद किंवा भांडणामुळे आपले मानसिक संतलुन बिघडेल. व्यापार मध्यम राहील. नोकरांवर अतिविश्वास दाखवू नका. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**सिंह** – व्यवसायात फायदा होईल त्यामुळे मन प्रसन्न राहील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील, मान सन्मानात वाढ होईल. चातुर्याने काम केले तर आजचा दिवश शुभ आहे.

**कन्या** – राजकीय कामे हातावेगळी होतील. जवळच्या व्यक्तीकडून उपयुक्त सल्ला मिळेल. धार्मिक कामात वेळ जाईल. आरोग्याची काळजी घ्या.

**तूळ** – सामाजिक मान सन्मान मिळाल्याने आनंदी रहाल. चैन करण्याकडे ओढा राहील. व्यापारात नवीन संबंध फायदेशीर ठरतील. वहान चालवताना काळजी घ्या.

**वृश्चिक** – न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या. अडकलेला पैसा मिळेल.

**धनू** – आपल्या बुध्दीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. आपल्या कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे. वाहन चालवतांना सावधानी बाळगा.

**मकर** – कुटुंबात मोठ्यांचे मार्गदर्शन मिळेल. कायद्यातील वादाचा निपटारा होईल. आर्थिक योग उत्तम आहेत. व्यवसायिक योजना गुप्त ठेवा.

**कुंभ** – प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल. आर्थिक लाभ झाल्याने आनंदी रहाल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक

**मीन** – प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुध्दीने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

# पारावरचा फड

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेटीदरम्यान खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडे शरद पवारांच्या प्रकृतीची विचारणा केली. याबाबत विचारता शरद पवार यांनी त्यांचे आभार म्हणत टीका टाळली. दुसरीकडे 'जळी, स्थळी, पाषाणी' भाजपबद्दल सुडाने पेटलेल्या खा. संजय राऊत यांनी मोदींना ढोंगी म्हणत समाचार घेतला. 'जर मोदींना पवारसाहेबांची काळजी असती तर त्यांचा पक्ष फोडला नसता, पळवला नसता असा टोलाही त्यांनी लगावला. इकडे मोदींच्या दहशतवादाविरोधातील भूमिकेबद्दल सुप्रिया सुळेंनी लेखही लिहून गौरवाची पुष्पसुमने उधळली आहेत. सुळे या ऑपरेशन सिंदूरबाबत माहिती देण्यासाठी मोदींच्या सरकारच्या शिष्टमंडळातून विदेश दौऱ्यावरही जावून आल्या. शिवाय 'ऑपरेशन सिंदूर'बद्दल विशेष अधिवेशनाची गरज नाही असे म्हणत पवारांनी त्यांची पाठराखण केली आहे. हा अप्रत्यक्ष पवारांचा पक्ष एनडीएत सामिलची वाटचाल तर नसेल ना? यासंदर्भात पारावरची चर्चा...!

**पांडूनाना :** शरद पवारसायबाचं नेमकं काय चाललंय कळतच न्हाय बग. हिकडं आजितदादासंगं बसत्यात, पक्श एक हुनार बी म्हंत्यात. ते काय होत न्हाय. हिकडं ते आन् त्यांची लेक खा. सुपरीया सुळे मोदीसायबाचं क्वतिक बी करत्यात.

**बाबूराव :** पवारसायबांचं तुलाच काय, कुनास्नीच काय कळत न्हाय. आरं मोदीसायबाचं तर ते गुरु हायती.

**पांडूनाना :** व्हय, मोदीसायबानं बारामतीत जावून पवारांचं क्वतीकसोहळं केलं हुतं.

**बाबूराव :** आता मातुर मोदीसायबानं पवारसायबाच्या डोळ्यादेक्त आजितदादाला फोडून आपल्यासंगं घेतलं. पवारसायबाला वाऱ्यावं सोडलंया.

**पांडूनाना :** ह्ये फुन्यांदा तू संजय राऊतसायबाच्या मनातलं बोलाय लागलायस बग. तेबी मोदीसायबानं सुपरीयाताईकडं तब्बयेतीचं इचारताच आसंच म्हटलं.

**बाबूराव :** चुकीचं काय हाय त्यात?

**पांडूनाना :** आरं मोदीसायबानं सुपरीयाताई भेटल्यावं समदी इचारत्यात तसंच इचारलं न्हवं. त्यात नवं काय?

**बाबूराव :** तसं आसतंया काय? आरं सुपरीयाताई आन् मोदीसायब आलिकडं मोदींचं लईच क्वतीक कराय लागल्याती. नेमकं त्यांच्या मनात काय हाय?

**पांडूनाना :** तू म्हंतुस तसं बी आसंल. आजितदादा हिकडं एक यायचं न्हाय म्हणत्यात. मग आजितदादास्नी बी हिसका दाकवायसाठी सुपरीयाताईला फुडं करून पवारसायबांचा पक्श भाजपच्या एनडीएत जात आसंल.

**बाबूराव :** पवारसायबांच्या हायातीत तसं हुनार न्हाय.

**पांडूनाना :** तसं काय न्हाय. आजितदादास्नी त्यांनीच पाहटंला पाटिवलं हुतं शपथविधीला. मग आता ते बाजूला हून ताईला म्होरं करत्याल.

**बाबूराव :** राजकारनात काय बी हुतंया.काय सांगावं? तसं बी आसंल!

**– अमृत चौगुले**

# उपदेश कथा

### कवीचा मोठेपणा

ही घटना आहे लखनौमधील ! त्यावेळी महाकवी निराला अमीनाबाद पार्कच्या पुढील मोहल्यात राहात होते. एक दिवशी ते असेच चालले होते. समोर एक टांगेवाला प्रवाशांची वाट पाहत उभा होता. निरालाजींनी त्याला नीट न्याहाळले व विचारले, परवा तूच मला हजरतगंजहून घेऊन आला होतास ना ? तो म्हणाला, होय हुजूर ! माझ्याकडून काही चूक झाली होती का ? निरालाजी सहज म्हणाले, अजिबात नाही. परवा माझ्याजवळ फक्त दोन आणेच होते. तूला आणखी पैसे द्यायला गेले दोन दिवस मी तुला शोधत आहे. हे पैसे ठेव तुझ्याजवळ ! पांच रुपयांची नोट पाहून तो टांगेवाला चांगलाच उखडला. निरालाजी म्हणाले, अरे रागावू नको. मी चांगल्या भावनने हे पैसे तुला देत आहे. परवा तुझा मुलगा फाटक्या तुटक्या वस्त्रात धावत तुझ्याकडे येऊन एक पैसा मागत होता, पण तोही तू देऊ शकत नव्हतास. ती तुझी असहाय्यता मी विसरु शकलो नाही. म्हणून हे पैसे ठेवून घे व त्या निरागस मुलाचे मन मोडू नकोस. त्या टांगेवाल्याच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. त्याने निरालाजींची क्षमा मागितली.

# दिनविशेष...

**आंतरराष्ट्रीय**

१४१८ - पॅरिसमध्ये उठाव, बरगंडीने शहर काबीज केले.

१६५३ - गॅबार्डची लढाई.

१७५९ - ॲबनर डबलडे याने नवा खेळ शोधला. त्याचे नाव बेसबॉल. आज हा खेळ संयुक्त संस्थानांचा (अमेरिका) राष्ट्रीय खेळ बनला आहे.

१७७५ - इंग्लंडने अमेरिकेच्या मॅसेच्युसेटस राज्यातील बंड मोडून काढण्यासाठी लष्करी कायदा लागू केला.

१९३० - जर्मनीचा मॅक्स श्मेलिंग जागतिक हेवीवेट चॅम्पियन बनला. प्रतिस्पर्ध्याला चुकीचे खेळल्यामुळे फाऊल केल्याने रिंगणातून बाहेर काढले गेल्यानंतर जागतिक स्पर्धा जिंकलेला तो एकमेव मुष्टियोध्दा आहे.

१९४४ - पहिला फ्लाइंग बॉम्ब इंग्लंडवर आदळला. युध्दात प्रथमच आधुनिक क्षेपणास्त्राचा वापर.

**राष्ट्रीय**

१९०५ - गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली.

१९७४ - रेल्वे संपात भाग घेतल्याबद्दल नऊ हजार कर्मचारी बडतर्फ.

१९७५ - इंदिरा गांधींची निवडणूक अलाहाबाद उच्च न्यायालयाने रद्द ठरविली. पुढची सहा वर्षे निवडणूक लढविण्यास मनाई.

## पुरूषांनाही संरक्षण मिळावे

आज समजातील कित्येक पुरुष कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरत आहेत. यावर अजूनही अनेकांचा विश्वास बसत नाही याला कारण आहे आपली संस्कृती पुरुषप्रधान आहे. पुरुषच महिलांवर अत्याचार करतो, त्यांचा मानसिक छळ करतो हेच आजवर आपण पाहत आलो आहोत पण आता काळ बदलला आहे. पुरुषही महिलांच्या अत्याचाराला बळी पडत आहे. आज कितीतरी पुरुष महिलांचा मानसिक अत्याचार सहन करत आहेत. पत्नी आपल्यावर अत्याचार करते आपला मानसिक छळ करते हे जर समाजात माहीत झाले तर आपलीच नाचक्की होईल या भीतीने अनेक पुरुष तो अत्याचार मुकाट्याने सहन करतात. ज्यांना हा अत्याचार सहन होत नाही ते आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. काही महिन्यांपूर्वी बंगळुरू मध्ये एका कंपनीत अभियंता असलेल्या ३४ वर्षीय तरुणाने पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. काही दिवसांपूर्वी पुणे जिल्ह्यातील उरुळी येथील तरुणाने आत्महत्या केली. त्यामुळे महिलांनी त्यांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याचा दुरुपयोग करू नये अशी टिप्पणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. तरीही या कायद्याचा दुरुपयोग कमी होत नाही. त्यामुळे पत्नी पीडित पुरुषांनाही सरकारने संरक्षणाचा अधिकार द्यावा. तरच पुरूषांनाही न्याय मिळेल.

# जन की बात...

## सर्वच लोकल वातानुकूलित नकोत!

मुंब्रा या ठिकाणी झालेल्या अपघाताची दखल घेत राज्य सरकारने भाडेवाढ न करता सर्वच लोकल गाड्या वातानुकूलित करण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच केली. याबाबत केंद्रीय रेल्वे मंत्र्यांशीही बोलणे झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मुंबई ठाण्यातील रेल्वे मार्गावर सध्या काही प्रमाणात वातानुकूलित लोकल गाड्या धावत आहेत ज्या कधीही त्यांच्या नियोजित वेळेत रेल्वे स्थानकांवर येत नाहीत याचा अनुभव चाकरमानी प्रतिदिन घेत आहेत.

ट्रेनमधील वातानूकुलीन यंत्रांचे दारात गळणारे पाणी, गर्दीच्या वेळेत स्वयंचलित उघड बंद होणाऱ्या दरवाजांना लागणारा अधिकचा कालावधी यामुळे या गाड्यांच्या वेळापत्रकावर प्रतिदिन परिणाम होत असतो ज्यामुळे रोजच काही गाड्या रद्द कराव्या लागतात तर काही वेळा नेहमीच्या धावणाऱ्या लोकल गाड्यांवर त्याचा परिणाम होतो.

आजमितीला वातानुकूलित रेल्वेगाड्यांचे तिकीट दर भरमसाठ असल्यामुळे या गाड्यांनी प्रवास करणाऱ्यांची संख्या तुलनेने अल्प असताना इतक्या समस्या येत आहेत तर भविष्यात नेहमीच्या तिकीट दरात सर्वच गाड्या वातानुकूलित केल्या तर लोकल ट्रेनने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या पाहता केवढी भीषण परिस्थिती उद्भवेल याची कल्पनाही करता येत नाही.

लोकल ट्रेनच्या वाहतुकीवर होणारा परिणाम लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी खासगी कंपन्यांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळा बदलण्याचे आणि शक्य त्या ठिकाणी वर्क फ्रॉम होम धोरण अवलंबण्याचे आवाहन केले आहे, जे नक्कीच स्वागतार्ह आहे. जर सरकारने केलेल्या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला तर लोकल मधील गर्दी कमी होण्यास नक्कीच मदत होऊ शकते. परंतू या सरकारच्या या आवाहनाला जोपर्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही तोपर्यंत लोकल गाड्यांतील प्रवाशांची संख्या कमी होणार नाही आणि लोकल गाड्यांतील प्रवाशांचा भार जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत सर्व गाड्या वातानुकूलित करण्याची घाई करू नये.

## तरूणांनी स्वत:चा विचार करावा

आजकाल स्वतःच्या भविष्याचा विचार करण्यापेक्षा राजकीय नेत्यांच्या भविष्याचा विचार करणारे लोक प्रत्येक समाजात संख्येने खूप वाढले आहेत. विशेष करून युवा पिढीला राजकीय नेत्यांचे खूप आकर्षण वाटत आहे. त्यांना त्यांचे कट्टर कार्यकर्ते म्हणून मिरवायची फार विचित्र सवय तरूणांना लागली आहे. हे आजकालचे युवक आपले शिक्षण सोडून, आपल्या जीवनतील ध्येय गाठायचे सोडून राजकीय नेत्यांच्या मागेपुढे फिरण्यात आघाडीवर आहेत. शाळा व कॉलेजला दांड्या मारून आणि प्रामाणिकपणे अभ्यास करायचा सोडून राजकीय नेत्यांचे बगलबच्चे म्हणून मिरवण्यात काय फायदा? स्वतःच्या भविष्याचा विचार करायचा सोडून, राजकीय नेत्यांच्या भविष्याचा विचार करणे खरंच योग्य आहे का? आई वडील मोठ्या आशेने आपल्याला शिक्षणासाठी शहरी भागात पाठवतात. शिक्षणासाठी पैसा पुरवतात. त्यांना वाटते की आपला मुलगा खूप खूप शिकून नोकरीला लागेल आणि आपल्याला सुखाचे दिवस दाखवेल. म्हणून ते मोठ्या आशेने जीवन जगत असतात. त्यांना या गोष्टीची काहीच कल्पना नसते. ज्यावेळी त्यांना या गोष्टी समजतात तेव्हा त्यांना धक्का बसतो. म्हणून तरूणांनी राजकीय पक्षाचा कार्यकर्ता बनून त्यांच्या मागे फिरण्यापेक्षा आईवडिल आणि स्वत:च्या भविष्याचा विचार करावा.

# शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने स्कूल बस नियमावलीचे काटेकोरपणे पालन व्हावे : पोलीस आयुक्त अमितेश कुमार

▪ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : शालेय विद्यार्थी वाहतूक हा अतिशय संवेदनशील विषय असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीच्या तसेच सर्व प्रकारच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून शाळा तसेच विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या स्कूल बस चालकांनी स्कूल बस नियमावलीचे काटेकोरपणे पालन करावे, असे निर्देश पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले.

पोलीस आयुक्तालयात आयोजित शालेय विद्यार्थी वाहतूक जिल्हा सुरक्षितता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी पोलीस सह आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे, प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, पुण्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले, पिंपरी चिंचवडचे प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव, बारामतीचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी उपस्थित होते.



पोलीस आयुक्त श्री. कुमार म्हणाले, शाळेत मुलांची ने-आण करणारी बस व इतर वाहने मुलांकरिता सुरक्षित राहतील याची खबरदारी संबंधित शाळेने घ्यावी याकरीता प्रत्येक बस व इतर वाहनात सीसीटीव्ही लावणे अनिवार्य करावे. शाळेच्या बसमध्ये ६ वर्षाखालील मुलांना ने-आण करणेकरिता महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. वाहनचालक, कंडक्टर, क्लीनर आदींची पोलीस पडताळणी करुन घ्यावी. बसेसचे वाहनचालक चांगले प्रशिक्षित, नैतिकदृष्ट्या सक्षम, पूर्वेतिहास चांगला असणारे असल्याची खात्री शालेय परिवहन समितीने करणे आवश्यक आहे. स्कुल बस चालक व अटेंडंट यांचे चारित्र्य पडताळणी, नेत्रतपासणी आणि वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी.

शिक्षण विभागामार्फत शाळा स्तरावर परिवहन समिती स्थापन केल्याबाबतचा आढावा घ्यावा. स्कुल बसेसची वाहनांची कसून तपासणी करावी. खाजगी वाहनातून शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांची विशेष तपासणी मोहिम राबवावी. नियमांचे उल्लंघन आढळलेल्या वाहनांवर, चालकांवर कठोर कारवाई करावी. सर्व संबंधित यंत्रणांनी बैठक घेऊन तसेच शालेय परिवहन समितीने स्कूल बस नियमावलीनुसार काम करीत असल्याची खात्री करावी. विद्यार्थ्यांच्या



सुरक्षित वाहतुकीसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, स्कूल बसचे अपघात रोखण्यासाठी शाळा, परिवहन विभाग, पोलीस विभाग यांच्यामध्ये समन्वय असावा, असेही कुमार म्हणाले.

श्री. भोसले यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली. शालेय विद्यार्थ्यांच्या अवैध वाहतुकीला आळा घालण्यासाठी परिवहन विभागाने १ जानेवारी ते ३१ मे २०२५ दरम्यान १ हजार ३२१ स्कूल बस तसेच ६५० इतर वाहनांची तपासणी केली. यामध्ये ४१४ स्कूल बस व २०८ इतर वाहने दोषी आढळली असून या कारवाईत नियमांच्या उल्लंघनाबद्दल ५५ कोटी २३ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला, अशी माहिती त्यांनी दिली.

# ब्लिंकिट स्टोअरमध्ये छापा

▪ जनप्रवास प्रतिनिधी

इंदापूर : पुणे शहरातील ब्लिंकिट स्टोअरमध्ये अन्न आणि औषध प्रशासनाने धाड टाकली आणि अनेक गंभीर त्रुटी उघडकीस आणल्या. यामुळे स्टोअरचा परवाना निलंबित करण्यात आला आहे. अन्न परवाना नसल्याने, अस्वच्छ स्थितीत अन्न साठवणूक, धूळ साचलेले अन्न पाकिटे, अस्वच्छ मजला, वैद्यकीय प्रमाणपत्रांशिवाय काम करणारे कर्मचारी, पेस्ट कंट्रोलचा अभाव, खरेदी बिलांचा अभाव, नियमित साफसफाईचा अभाव, कोल्ड स्टोरेज युनिटसाठी सहकार्य प्रमाणपत्राचा अभाव, अप्रशिक्षित कर्मचारी आणि ऑडिट न केल्यामुळे ही कारवाई केली. कंपनीच्या म्हणण्यानुसार, धाड टाकली तेव्हा परवाना काही दिवसांपूर्वीच संपला होता आणि तो नूतनीकरणाच्या प्रक्रियेत होता.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे शहरातील एका ब्लिंकिट स्टोअरमध्ये तपासणी दरम्यान अनेक




गंभीर त्रुटी आढळल्या. यामुळे स्टोअरवर कारवाई केली. स्टोअर अन्न परवान्याशिवाय चालवले जात होते, असे सांगितले.

स्टोअर कर्मचाऱ्यांनी सांगितले की, परवाना काही दिवसांपूर्वीच संपला होता आणि तो नूतनीकरणासाठी पाठवला आहे. तपासणीत अनेक उल्लंघन आढळले, ज्यामुळे स्टोअरचा परवाना निलंबित करण्यात आला. स्टोअरकडे अन्न परवाना नव्हता. अन्न उत्पादने अस्वच्छ स्थितीत साठवली गेली होती. अनेक अन्न पाकिटांवर धूळ साचलेली होती. परिसरातील फरशी धूळ आणि अस्वच्छ होती. सुमारे ५० कर्मचारी अंधाऱ्या, कमी प्रकाशाच्या खोल्यांमध्ये वैध वैद्यकीय प्रमाणपत्रांशिवाय काम करत होते. कोणतीही पेस्ट कंट्रोल केलेली नव्हती; स्टोअर त्यासंबंधी कोणतेही प्रमाणपत्र सादर करू शकले नाही. कर्मचारी साठवलेल्या अन्नपदार्थांची खरेदी बिले सादर करू शकले नाहीत. परिसराची नियमित साफसफाई केली जात नव्हती. कोल्ड स्टोरेज युनिटसाठी कोणतेही सहकार्य प्रमाणपत्र नव्हते. कर्मचारी अप्रशिक्षित होते आणि त्यांनी हातमोजे किंवा टोपीसारखे मूलभूत सुरक्षा उपकरणे घातली नव्हती. स्टोअरचे अंतर्गत किंवा बाह्य ऑडिट केलेले नव्हते.

या निरीक्षणांच्या आधारावर, पुढील सूचना मिळेपर्यंत स्टोअरचा परवाना निलंबित केला आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, आमचा परवाना धाडीच्या काही दिवस आधीच संपला होता, त्यामुळे स्टोअर चालवण्याचा परवाना आमच्याकडे होता. अन्न सुरक्षा आणि मानके कायद्यांचे उल्लंघन केल्यामुळे ही कारवाई करण्यात आली.

# डॉ. श्याम मुडे फर्ग्युसनचे प्राचार्य

▪ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : डॉ. श्याम मुडे यांची डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन महाविद्यालयाचे (स्वायत्त) अठरावे प्राचार्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुडे यांनी भूगर्भशास्त्र या विषयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून पी. एचडी. पदवी संपादन केली आहे. शिक्षण, संशोधन आणि अध्यापनाच्या माध्यमातून भूगर्भशास्त्र या विषयात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये त्यांचे पन्नासहून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. सन २०२२ पासून ते फर्ग्युसनच्या भूगर्भशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांना आयएनएसए सायंटिस्ट आणि शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



सहयोगी संशोधनासाठी त्यांनी तैवान मधील राष्ट्रीय चुंग चेंग विद्यापीठातील पृथ्वी आणि पर्यावरण विज्ञान विभागाला भेट देऊन या संस्थेबरोबर सामंजस्य करार केला आहे. जागतिक शिक्षण आणि उद्योगांच्या मागणीनुसार कौशल्याधारित अभ्यासक्रम, भारतीय ज्ञान प्रणालीचे सक्षमीकरण आणि जगभरातील विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक आणि उच्च गुणवत्तेचे शिक्षण फर्ग्युसन महाविद्यालयात मिळावे या उद्देशाने कार्यरत राहणार असल्याचे डॉ. मुडे यांनी सांगितले.

# इंदापूर येथील पोलिस हवालदार विष्णू केमदारने बेपत्ता

## प्रियांका केमदारने यांचे वरिष्ठांवर गंभीर आरोप

▪ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

इंदापूर : इंदापूर येथील पोलिस हवालदार विष्णू सुभाष केमदारने हे बेपत्ता झाल्याची तक्रार त्यांची पत्नी प्रियांका केमदारने यांनी इंदापूर पोलिस ठाण्यात दाखल केली आहे. यावेळी पोलिस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांनीच विष्णू केमदारने यांना जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला आहे.

प्रियांका केमदारने यांनी दिलेल्या तक्रार अर्जानुसार, मंगळवार १० जून रोजी सकाळपासून त्यांचे पती पोलिस हवालदार विष्णू केमदारने हे इंदापूर पोलिस ठाण्याच्या शासकीय वसाहतीतून बेपत्ता झाले असल्याचे लक्षात आले. त्यांनी शोधाशोध करीत असताना घरात एक चिठ्ठी मिळून आली. त्यानुसार मागील दोन महिन्यांपासून पोलिस निरीक्षक सूर्यकांत कोकणे

यांनी पोलिस हवालदार रासकर आणि पोलिस कॉन्स्टेबल सूर्यवंशी यांच्या




सांगण्यावरून जीवे मारण्याची धमकी दिली आहे. तसेच, तुझी नोकरी व यापुढील आयुष्य हे उद्ध्वस्त करून टाकेल, अशी भाषा वापरून मला जीवे मारण्याची धमकी दिली आहे, असे चिठ्ठीत लिहिले आहे. असा आरोप केमदारने यांच्या पत्नीने केला आहे. यावरून इंदापूर पोलिस स्टेशन येथे बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

दरम्यान, विष्णू केमदारने हे इंदापूर पोलिस ठाण्यामध्ये प्रतिनियुक्तीवर कार्यरत होते. त्यांच्याबाबत वारंवार अनेक तक्रारी येत असल्याने त्यांना २७ एप्रिल २०२५ रोजी त्यांचा इंदापूर पोलिस ठाण्याकडील पदभार काढण्यात आला होता, भिगवण पोलिस ठाण्याकडे

त्यांना रुजू होण्यासाठी कळवण्यात आलं होतं. मात्र त्यांनी भिगवन पोलिस ठाण्याचा पदभार स्वीकारला नव्हता. तरी त्यांच्या पत्नीच्या तक्रारीवरून बेपत्ता झाल्याची नोंद घेण्यात आली असून त्यानुरूप पुढील तपास सुरू आहे, असे सूर्यकांत कोकणे यांनी सांगिले. याबाबत उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड म्हणाले, ''संबंधित पोलिस कर्मचाऱ्यांच्या पत्नीची तक्रार

दाखल करून घेतली आहे. पोलिस खात्याकडून या कर्मचाऱ्यांचा शोध घेतला जात असून त्या कमी पोलिस पथक तयार केले आहे. चिठ्ठीमध्ये केमदारणे यांनी जे आरोप केले आहेत त्या आरोपांची वरिष्ठ कार्यालयाकडून चौकशी केली जाईल, त्या पद्धतीचा अहवाल पाठवला जाईल.''

# वाहनांना एचएसआरपी बसवून घेण्याचे आवाहन

▪ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : राज्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या नोंदणीकृत मोटार वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविण्याची निर्देश असून नागरिकांनी वाहनांना एचएसआरपी बसवून घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने एका रिट याचिकेत दिलेल्या निकालानुसार राज्य शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना एचएसआरपी बसविण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० नुसार सर्व वाहनांना एचएसआरपी बसविण्याची तरतूद आहे. त्यानुसार परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत जुन्या वाहनांना एचएसआरपी लावण्याचे कामकाज गतीने सुरू आहे, याकामात अधिक गतीमानता येण्याकरीता विशेष उपाययोजना करण्याकरीता आयुक्तालयाच्यावतीने निर्देश देण्यात आले आहे. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जून्या परिवहन संवर्गातील वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण, परवानाविषयक कामकाज व खाजगी संवर्गातील वाहनांचे नोंदणी प्रमाणपत्र नूतनीकरण कामकाज वगळून वाहन हस्तांतरण, नोंदणी प्रमाणपत्रामध्ये पत्ता बदल करणे, वित्त बोजा चढविणे किंवा उतरविणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र देणे, नाहरकत प्रमाणपत्र जारी करणे, वाहनांमध्ये बदल करणे आदी वाहनविषयक सर्व कामकाज एचएसआरपी बसविल्याशिवाय १६ जून २०२५ पासून करण्यात येणार नाही. तथापि, वाहन मालकांनी एचएसआरपी बसविण्यासाठी पूर्व नियोजित दिनांक व वेळ घेतली असल्यास त्या पावतीची खातरजमा करून त्यांच्या वाहनांचे कामकाज करण्यात येईल. १६ जून २०२५ पासून एचएसआरपी न बसवलेल्या वाहनांचे कामकाज करण्यात येणार नाही, असे पिंपरी चिंचवडचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी पत्रकान्वये कळविले आहे.

# मंचर येथील सराईत गुन्हेगार एक वर्षाकरीता नागपूर कारागृहात स्थानबध्द

▪ जनप्रवास प्रतिनिधी

निरगुडसर : मंचर ( ता. आंबेगाव) पोलीस स्टेशन हद्दीतील पवन सुधिर थोरात वय २५ वर्षे रा. मंचर, ता. आंबेगाव, या सराईत गुन्हेगार असून त्याचेवर खुन, खुनाचा प्रयत्न, खंडणी, गर्दीमारामारी, अपहरण, अवैध वाळूचोरी, अवैध शस्त्रबाळगणे यासारखे गंभीर स्वरूपाचे एकूण १२ गुन्हे दाखल आहेत. तसेच मंचर पोलीस स्टेशन व खेड पोलीस स्टेशनने त्याचेवर यापुर्वी मोका अंतर्गत कारवाई केलेली आहे. पवन सुधिर थोरात याला वेळोवेळी गुन्हयात अटक करण्यात आली असून तो जामीनावर आलेवर प्रतिबंधात्मक कारवाई देखिल करण्यात आली



आहे. परंतू त्याचे वर्तनूकीत कोणत्याही प्रकारची सुधारणा होत नव्हती, सामान्य लोकांचे मनात त्याचेविषयी भिती निर्माण झाली होती. त्याचेवर वेळीच कायदयाचे बंधन राहावे तसेच त्याचे गुन्हेगारीला, विघातक कृत्यांना आळा बसावा घालण्याकरीता पवन सुधिर थोरात याला जेलमध्ये स्थानबध्द करणेबाबत पोलीस निरीक्षक मंचर पोलीस स्टेशन यांनी, मा. पोलीस अधिक्षक सो पुणे ग्रामीण यांचे मार्फतीने मा जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे प्रस्ताव पाठविला होता.

दि. ९/६/२०२५ रोजी मा जिल्हाधिकारी सो पुणे यांनी पवन सुधिर थोरात याचे स्थानबध्देचे आदेश पारीत केले असून पवन थोरात यास ताब्यात घेवून मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे जमा करण्यात आले आहे.

मंचर पोलीस हद्दीत जो कोणी कायदयाचे उल्लंघन करील, जनतेमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करील अशा सर्व गुन्हेगारांवर मंचर पोलीस स्टेशन लक्ष ठेवून आहे. त्यांचेवर देखिल अशा प्रकारे योग्य कारवाई करण्यात येणार असल्याचे मंचर पोलीसांनी सांगितले. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक संदिपसिंग गिल, अपर पोलीस अधिक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पो. अधिकारी अमोल मांडवे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ, पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर (स्थानिक गुन्हे शाखा ), सहा पोलीस निरीक्षक सुनिल बडगुजर, पोलीस उपनिरीक्षक यशवंत यादव, सहा. पोलीस उपनिरीक्षक राजेश नलावडे, नितीन बनकर, पोलीस ह. संजय नाडेकर, शेखर भोईर, प्रणयकुमार उर्किडे, शरद कुलवडे, नंदकुमार आढारी, पोलीस अंमलदार अविनाश दळवी, योगेश रोडे, अजित पवार, तुषार अर्जुन, लखन माने यांनी केली आहे.

# शिरूर तालुक्यातील पूर्व भागात वटपौर्णिमा उत्साहात साजरी



▪ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

निमोणे : शिरूर तालुक्याच्या पूर्व भागात वटपौर्णिमेचा सण महिलांनी मोठ्या श्रद्धा व उत्साहात साजरा केला. पारंपरिक वेशभूषा, साडी, हिरव्या चूड्या, फुलांची सजावट, मंगल गीते आणि वडाच्या झाडाची पूजा अशा पारंपरिक रितीने विधीवत वटपौर्णिमा पार पडली.

स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटवृक्षाची पूजा करून त्याच्या भोवती प्रदक्षिणा घालतात. यानुसार गावागावांत, विशेषतः गुणाट, निमोणे, शिंदोडी भागात महिलांनी सामूहिक पूजेला प्राधान्य दिले. काही ठिकाणी सामाजिक संस्था आणि महिला मंडळांनी सामूहिक कार्यक्रमांचे आयोजन करून पारंपरिकतेला आधुनिक स्पर्श दिला.

वटपौर्णिमेच्या निमित्ताने महिलांमध्ये आपुलकी आणि पारंपरिक संस्कृतीचे जतन करण्यात आले.

सर्वत्र उत्साहाचे आणि श्रद्धेचे वातावरण पाहायला मिळाले.


# पुणे नगर रस्त्यावर नागरिकांच्या सुरक्षेच्या आणि वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना कराव्यात : आमदार बापूसाहेब पठारे

▪ जनप्रवास प्रतिनिधी

नागरगाव : नागरगावं- पुणे-नगर रस्त्यावरील वाढती वाहतूक कोंडी, अपुऱ्या सुविधा, रस्त्यांची दुरवस्था व पादचारी मार्गांच्या असुरक्षित अवस्थेमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या वाहतूक संबंधित समस्यांवर तातडीने उपाययोजना व्हाव्यात यासाठी वडगावशेरी मतदारसंघाचे आमदार बापूसाहेब पठारे यांनी महानगरपालिका प्रशासन, वाहतूक नियंत्रण विभाग, पुणे शहर वाहतूक शाखेकडे निवेदनाद्वारे मागण्या मांडल्या आहेत.

तत्पूर्वी, येरवडा, शास्त्री नगर, कल्याणीनगर, रामवाडी, विमाननगर, टाटा गार्डन, खराडी बायपास, जनक बाबा दर्गा, युवान आयटी पार्क, खराडी जकात नाका या परिसरांमध्ये सिग्नल फ्री योजना अंमलात आणली आहे. त्यामुळे वाहतुकीचा वेग वाढला असला, तरी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अनेक उपाययोजना प्रलंबित असल्याचे दिसून येते. याच पार्श्वभूमीवर बापूसाहेब पठारे यांनी मागणीद्वारे उपाययोजना सुचवल्या आहेत.

याशिवाय, दुसऱ्या निवेदनाद्वारे पठारे यांनी विमाननगर व चंदननगर येथील भुयारी मार्गांची अत्यंत खराब स्थिती अधोरेखित केली



**बापूसाहेब पठारे यांनी सूचवलेल्या प्रमुख उपाययोजना**

- ✻ बीआरटी मार्ग काढल्यानंतर विस्कळीत झालेला डिव्हायडर रस्त्याच्या मध्यभागी नेणे, ज्यामुळे रचना संतुलित व सुरक्षित होईल.
- ✻ झेब्रा क्रॉसिंग, फूटपाथ व काही सेकंदाचे पादचारी सिग्नल यांची उभारणी.
- ✻ डिव्हायडर सुरू होणाऱ्या ठिकाणी प्रतिबिंबित फलक
- ✻ प्रमुख भागांकडे जाण्यासाठी दिशादर्शक फलक, रस्ता मार्गदर्शक सूचना फलक
- ✻ विमाननगर व चंदननगर येथील भुयारी मार्गांची तातडीने दुरुस्ती, प्रकाशयोजना व साफसफाई
- ✻ वाहतूक नियंत्रणासाठी स्मार्ट सिग्नल यंत्रणा

आहे. या भुयारी मार्गांची तातडीने दुरुस्त करून नागरिकांना सुरक्षित वापरासाठी उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी महानगरपालिका मुख्य




अभियंता केली आहे. या भुयारी मार्गांमध्ये प्रकाशयोजना अपुरी असून, स्वच्छतेचा अभाव आहे. त्यामुळे महिला, मुली, विद्यार्थीवर्ग तसेच वृद्ध नागरिकांना या मार्गांचा वापर करताना असुरक्षितता वाटते.

एकूणच मागण्यांबाबत बोलताना बापूसाहेब पठारे म्हणाले, की वडगावशेरी मतदारसंघामधील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याच्या दृष्टीने विविध माध्यमातून मी प्रयत्नशील आहे. वाहतूक कोंडी फोडून सुरळीत वाहतुकीसोबतच सुरक्षित वाहतूक असणेही गरजेचे आहे. मी मांडलेल्या मागण्यांचा विचार प्रशासन दरबारी होईल, ही खात्री आहे. वाहतूक व दळणवळण नागरिक बांधवांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे आणि त्या दृष्टीने कोणतीही तडजोड होऊ नये.

# नगर मधील भुईकोट किल्ल्याजवळ दिसला १३ फुटी रॉक पायथन अजगर

## गोविंद जोशी यांनी वर्षभरात वाचवले ४ अजगरांचे प्राण



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : येथील किल्ल्या जवळील आय लव नगर गार्डन जवळ काल रात्री १३ फुटी रॉक पायथन अजगर येथील रहिवासी सामाजिक कार्यकर्ते व व्यापारी गोविंद जोशी, कौशल जोशी व करण पारखे यांना रात्री घरी जाताना दिसला.त्यांनी त्वरित सर्पमित्र अमित गायकवाड यांना बोलून घेतले व त्याला पकडण्यासाठी त्यांना अर्धा तास लागला.यावेळी पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती,सकाळी त्याला दूर जंगलात निसर्ग अधिवासात सोडण्यात आले

गोविंद जोशी यांनी आत्तापर्यंत या परिसरात वर्षभरात ४ अजगराचे प्राण वाचवले आहेत तसेच अनेक सरपटण्याऱ्या प्राण्याचे त्यांनी अनेक वर्षांपासून प्राण वाचवत आहे, त्यांना रेसिक्यू करून त्याच्या अधिवासात सोडत आहेत, यामध्ये ३ किल्ल्याजवळ व १ बेलेश्वर मंदिर जवळ त्यांनी पाहिल्यावर सर्पमित्रांना बोलावून त्यांना पकडले. नाहीतर रात्रीच्या वेळेस हे गाडीखाली येऊन मृत्युमुखी पडतात,रात्रीच्या वेळेस हे अजगर पावसाळ्यात,उन्हाळ्यात बाहेर पडतात.त्यामुळे या परिसरात रात्री पायी फिरताना व गाडी चालवणाऱ्यांनी काळजी घ्यावी असे सरपटणारे प्राणी दिसल्यास त्यांना वाचवावे व त्वरित सर्पमित्रांना कळवावे असे ते म्हणाले

हा भाग निसर्ग संपन्न आहे तसेच नगरजवळ सर्वच ठिकाणी वन्यप्राणी मोठ्या प्रमाणावर आहेत,यामध्ये भारतात रॉक पायथन हा दुर्मिळ होत चाललेला आहे आणि त्याला वाचवण्याची गरज आहे,किल्ला परिसरात परिसरात मोर,विषारी बिनविषारी सर्प,विविध पक्षी यांचा मोठ्या प्रमाणावर ती अधिवास आहे.

येथे जंगल पण आहे व खंदक पण आहे,त्यामुळे त्यांना सुरक्षित जागा आहे,जिल्हा प्रशासनाने या ठिकाणी त्यांचे संवर्धन करण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी ही गोविंद जोशी यांनी केली आहे

## संक्षीप्त वृत्त

### नेटफ्लिक्स आणि हुलूवर कार्तिकेय गुप्ता यांचे एकामागून एक जागतिक ट्रू क्राइम हिट्स

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : भारतीय एडिटर, दिग्दर्शक आणि स्क्रोलएक्स.आयओ चे संस्थापक कार्तिकेय गुप्ता नेटफ्लिक्सवर इंद्राणी मुखर्जी डॉक्युसरीज आणि हुलू / एबीसीवरील दि परफेक्ट वाइफ अशा एकामागून एक दोन क्राइम हिट्स देऊन जागतिक स्ट्रिमिंग स्टेजवर धुमाकूळ घालत आहेत.

नेटफ्लिक्स मालिकेसाठी सुपरवायझिंग एडिटर म्हणून गुप्ता यांनी भारतातील सर्वाधिक विवादित गुन्हेगारी प्रकरणांची कथा पडद्यावर उतरवण्यास मदत केली. त्यांच्या या संपादनाच्या कामात गुंतागुंतीच्या टाइमलाइन्स पुनर्जीवित करणे, भावनिक उतारचढाव दाखवणे आणि मालिकेची एकूणच रचना अत्यंत ताकदीने साकार करणे या गोष्टी समाविष्ट आहेत. या सर्वांमुळे ही मालिका भारतातील सर्वोत्तम दर्जाची गुन्हेगारी मालिका ठरली आहे. ती सध्या १९० पेक्षा अधिक देशांमध्ये दाखवली जात आहे. या मालिकेचे कौतुक गार्डियन, व्हरायटी आणि इंडिया टुडे यांनी केले आहे.

### माळीवाडा परिसरात महिलांनी साजरी केली वटपौर्णिमा



■ जनप्रवास प्रतिनिधी

नगर: वटपौर्णिमेनिमित्त माळीवाडा देवकर गल्ली मधील पंचवटी परिसरतील वडाच्या झाडाला महिलांनी फेर्या मारुन पुजा केली. याप्रसंगी माजी महापौर सुरेखा कदम ,सोनाली कदम ,प्रतीक्षा सैंदाणे ,रजनी कोथिंबिरे ,शारदा जाधव ,भारती कदम,मुक्ताबाई कदम ,मंदा सौदागर आदिंसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या .

यावेळी माजी महापौर सौ.सुरेखा कदम म्हणाल्या कि भारतीय संस्कृतीत सण, उत्सव हे आरोग्य रक्षण व निसर्गाशी समरस असे आहेत. या सगळ्यांचा विचार केल्यास आयुर्वेदिक परंपरेला चालना देणारे आहे. वटपौर्णिमेच्या दिवशी स्त्रीयांनी उपवास करावा, वृटवृक्षाचा सान्निध्यात रहावे, मैत्रिणीबरोबर हसत खेळत वेळ घालवावा. याच बरोबरच आध्यात्मिक कथेनुसार सती सावित्रीने यमदूताकडून आपल्या पतीचे प्राण परत आणले अशी अख्यायिका आहे. त्यामुळे आपल्या पतीच्या दीर्घाष्युसाठी व जन्मोजन्म हाच पती मिळावा, यासाठी वटपौर्णिमेचे व्रत केले जात आहे, हा सण आपल्या जीवनात आनंद घेऊन येणार असल्याचे सांगितले.

### भारतातील सर्वाधिक पुरस्कार-प्राप्त प्रीमियम सेदान 'फोक्सवॅगन व्हर्टस'ला तीन गौरवशाली वर्षे पूर्ण

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : फोक्सवॅगन व्हर्टसने भारतात विक्रीच्या गौरवशाली तीन वर्षांचा टप्पा पूर्ण केला आहे, ज्यासह प्रीमियम सेदान श्रेणीमध्ये मापदंड म्हणून स्वत:चा दर्जा अधिक दृढ केला आहे. जूनमध्ये तिसरा वर्धापन दिन साजरा करणाऱ्या व्हर्टसने लक्षवेधक ३२ टक्के श्रेणी हिस्सा (वायटीडी'२५) संपादित केला आहे, ज्यामुळे ही सतत कार्यक्षमता देणारी एकमेव सेदान ठरली आहे.

फोक्सवॅगन व्हर्टस अभिमानाने 'मेड इन इंडिया, फॉर इंडिया अँड द वर्ल्ड' कार आहे. लाँच झाल्यापासून व्हर्टसने भारतातील ग्राहकांसाठी प्रीमियम सेदान श्रेणीला नव्या उंचीवर नेले आहे. या कारमधील आकर्षक डिझाइन, उत्साहवर्धक कार्यक्षमता आणि सिग्नेचर जर्मन रचना दर्जाने आकर्षकता व उत्साहाला महत्त्व देणाऱ्या ड्रायव्हिंग उत्साहींमध्ये निष्ठावान चाहतावर्ग निर्माण केला आहे.

### सिग्निफाय तर्फे त्यांच्या हर गांव रोशन सीएसआर उपक्रमा अंतर्गत ७८ हजारांहून अधिक लोकांच्या जीवनात केला बदल

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : आपल्या हॅशटॅग ब्रायटर लिव्हस बेटर वर्ल्ड दृष्टिकोनाचा अवलंब करत सिग्निफाय या लायटिंग क्षेत्रातील जगभरातील आघाडीच्या कंपनी तर्फे त्यांच्या महत्त्वपूर्ण अशा हर गांव रोशन सीएसआर उपक्रमाअंतर्गत आंध्रप्रदेशातील पार्वतीपुरम मन्यम जिल्ह्यातील २३० गावांमध्ये प्रकाश पोहोचवला आहे.

या बदलात्मक अशा प्रकल्पातील शाश्वत लायटिंग उपायांमुळे या भागातील १७,७६६ कुटुंबांवर सकारात्मक परिणाम झाला असून भागातील ७८,२०० हून अधिक लोकांचे जीवनमान सुधारण्यास मदत झाली आहे.

या प्रकल्पाचे अधिकृत उद्घाटन करण्यासाठी पार्वतीपुरम मन्यम जिल्ह्याचे जिल्हा कलेक्टर, आयएएस श्री श्याम प्रसाद यांच्या सह सिग्निफायच्या वरिष्ठ व्यवस्थापनातील अधिकारी आणि अंमलबजावणी भागीदार असलेल्या जन कल्याण समाख्या (जेकेएस) चे अधिकारी उपस्थित होते. या प्रकल्पाची अंमलबजावणी ही सामाजिक संस्था असलेले अंमलबजावणी भागीदार जन कल्याण समाख्या (जेकेएस) यांनी केली असून यामध्ये समाजाचा सहभाग घेऊन बाहेरील लायटिंग उपायांची जोडणी करुन त्याचे व्यवस्थापन केले जाणार आहे.

स्थानिक समाजातील घटकांना या लायटिंग उपायांची देखभाल कशी करावी याचे ज्ञान देण्यात आले असून यामुळे आता या प्रकल्पाचा दीर्घकालीन सकारात्मक परिणाम दिसून येणार आहे.

# पारनेर मध्ये वटपौर्णिमेनिमित वृक्षारोपण

■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : स्त्रियांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जिवनात वटपौर्णिमा हा सण अतिशय महत्त्वाचा आहे. जो त्यांच्या पतीवरील प्रेम आणि आदराचे प्रतिक आहे अशा हिंदु धार्मिक सणा निमित्ताने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, पारनेर आणि मैत्री कट्टा पारनेर यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर शहरातील क्रीडा संकुल येथे वडाचे झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले. पारनेर नगर पंचायतच्या माजी नगराध्यक्षा सुरेखा भालेकर यांच्या सामाजिक संकल्पनेतून वडाचे झाडाचा वृक्ष रोपणचा उपक्रम राबविण्यात आला. मैत्री कट्टाच्या सदस्यांनी वडाच्या रोपाची विधिवत पूजा केली तर वृक्षमित्र डरकाबाई तबाजी तांबे यांच्या शुभहस्ते या वृक्षाचे रोपण करण्यात आले. तर उपस्थित मैत्री कट्ट्याचे सदस्य यांना प्रत्येकी एक गुलाबाच्या



फुलांचे झाड भेट देण्यात आले.यावेळी पारनेरच्या माजी उपनगराध्यक्षा सुरेखा भालेकर, मैत्री कट्ट्याचे सदस्य मंगल भालेकर, सीमा भालेकर, संगीता भालेकर, मनिषा तांबे, सुवर्णा गट, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे डिजिटल मिडियाचे जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे, सचिव लतिफ राजे सर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे शहराध्यक्ष भगवानराव गायकवाड ,सहदेव घनवट (मेजर)रावसाहेब पवार (मेजर), मल्हार भालेकर आदी उपस्थित होते.

> पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्वात प्रथम नागरिकांमध्ये जनजागृती व्हायला हवी त्या साठी जास्तीत जास्त वृक्षांचे रोपण केले गेले पाहिजेत. झाडांचे जतन आणि संवर्धन होणे अतिशय महत्त्वाचे आहे.तसेच पाणी वापर पण योग्य पद्धतीने असायला हवा ते पाणी साठवले गेले पाहिजे. प्लास्टिकचा वापर टाळला पाहिजे. अनावश्यक ऊर्जा म्हणजे वीज वापरावर पण बंधन असायला हवे. पर्यावरण विषयी प्रत्येक नागरिकांमध्ये जनजागृती कशी निर्माण होईल या साठी प्रयत्न केले गेले पाहिजे.
>
> – सुरेखा भालेकर मा.उपनगराध्यक्षा, पारनेर नगरपंचायत.

# अहिल्या नगर हद्दीतील ४१ ओढे नाले साफसफाई, अतिक्रमण मुक्त झालेच पाहिजे : संतोष नवसुपे



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : अहिल्या नगर शहरातील मनपा हद्दीत असणारे ४१ ओढे नाले नष्ट झाल्यामुळे शहरांमध्ये भर पावसाळ्यामध्ये आपत्ती व्यवस्थापन याचे नियोजनाचा अभाव असल्याने व मनपाने नेमून दिलेल्या ठेकेदार व त्याची यंत्रणा अयशस्वी ठरल्याने गेली दहा ते पंधरा वर्षांपासून संपूर्ण मॅनेजमेंट होऊन अंतर्गत नालेसफाई व तसेच सीना नदी व अंतर्गत येणारे ओढे– नाले यांची सफाई ठेकेदार एजन्सीला दिले जाते, परंतु यावर कोणताच वचक नसून सीएसआय व एसआय हे फक्त कागदोपत्री ठेकेदारांना काम केल्याचे सर्टिफिकेट देतात, परंतु रस्त्यावर काम होताना दिसत नाही. तसेच सीना नदीचा गाळ जेसीपीने तिथल्या तिथच सरकावला जातो. व पुर आल्यानंतर तो गाळ पुन्हा तेथेच येऊन पडातो.

तसेच शहरातील ३२ हॉस्पिटल यांची चौकशी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांची सक्तीच्या रजेवर गेल्यानंतर झालेली चौकशी होती. पुढे या ३२ हॉस्पिटलच्या काय कारवाई केली याची मनपाने कुठलीही माहिती दिलेली नाही. हे अचानक हे हॉस्पिटल पावन कसे करून घेतले. हा नागरिकांना पडलेला प्रश्न आहे.

# मांडवगण येथील शिवाजी वामन बेपत्ता

## श्रीगोंदा पोलीस स्टेशन मध्ये तक्रार

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : श्रीगोंदा जनप्रवास प्रतिनिधी = श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण येथील शिवाजी शंकर वामन हे आपल्या मुलाबरोबर मिलिटरी कॅम्प च्या कॅन्टीन मधून काही साहित्य खरेदी करण्यासाठी गेले असता हे अचानक बेपत्ता झाले असल्याने ते अद्याप घरी पोहोचले नाहीत याबाबत पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आलेली आहे .

श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण येथील शिवाजी शंकर वामन हे दिनांक ०४/०६/२०२५ रोजी दुपारी १/३० वाजनेचे सुमारास मुला बरोबर भिंगार कम्प च्या आर्मीची कॅन्टीन मध्ये काही साहित्य खरेदी करण्यासाठी गेले होते ते मुलाला म्हणाले की, तु साहित्य घेवून ये तो पर्यंत मी बाहेर थांबतो असे सांगितले त्यानंतर मुलगा दुपारी २/०० वाजनेचे सुमारास आर्मी कन्टींग मधुन बाहेर आले शंकर वामन हे कन्टींगचे बाहेर दिसले नाही त्यानंतर त्यांचा कन्टींगचे परिसरात शोध घेतला असता ते कोठे ही मिळुन आले नाहीत , त्यानंतर मुलाने बहिण नामे करुना गणेश नन्नवरे हिचे फोनवर फोन करून विचारले की, वडील शिवाजी हे घरी आले आहे का तेव्हा तिने सांगीतले की, ते घरी आलेले नाहीत

नंतर अहिल्यानगर शहरात व नातेवाईकांकडे शोध घेतला असता ते कोठे ही मिळुन आले नाही तेव्हा खात्री झाली की, ते कोणाला काहि एक न सांगता कोठे तरी निघुन गेले आहेत. त्यांचे वर्णन खालील प्रमाणे नाव शिवाजी शंकर वामन, वय ७३वर्षे, रा. मांडवगण ता अहिल्यानगर उंची ५फुट ८ इंच, रंग सावळा, केस पांढरे, डोळे

काळे, मिशी पांढरी, अंगाने मजबूत, अंगात पांढया रंगाचा शर्ट, आर्मी रंगाची पन्ट, केशरी रंगाचा पंचा, लाल रंगाचे हेल्मेट, व सोबत काळ्या रंगाची स्प्लेंडर मोटार सायकल



एम एच १७ एल ९४६२ असा असून पायात विटकरी रंगाचा बुट, असे वर्णन आहे तरी कुणाचा संपर्क झाल्यास अथवा आढळून आल्यास मोबाइल नंबर ७८८७८२३०४५ यावर संपर्क साधावा असे राजू शिवाजी वामन यांनी आवाहन केले आहे.

# बच्चूभाऊ कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी १४ जून रोजी उग्र आंदोलन करण्याचा इशारा

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : शेतकरी, कष्टकरी, कामगार, दिव्यांग,महिला व अन्य वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी मा.बच्चूभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली श्री क्षेत्र गुरुकुंज मोझरी येथे दिनांक ०८ जून २०२५ पासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू आहे.

परंतु शासनाने रास्त मागण्याबाबत अद्यापपर्यंत कुठलीही दखल न घेतल्याने प्रहार दिव्यांग क्रांती संघटना, महाराष्ट्र राज्य यांचा पूर्ण पाठिंबा देण्यासाठी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले.या निवेदनावर प्रहार दिव्यांग क्रांती संघटना जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मणराव पोकळे, ,महिला जिल्हाध्यक्ष कु.लक्ष्मीताई देशमुख,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पोपट शेळके जिल्हा सचिव हमीद शेख आदींचे सह्या आहेत. या आंदोलनाला बळ देण्यासाठी व शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दिनांक १४ जून २०२५ रोजी शनिवारी संपूर्ण राज्यभरात प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेतर्फे उग्र आंदोलन करण्यात येणार आहे.सदर आंदोलन पूर्णपणे लोकशाही मार्गाने, शांततेत व नियमानुसार पार पडेल, याची ग्वाही देतो.तरी, प्रशासनाने याची नोंद घ्यावी व आवश्यक त्या सुविधा व सहकार्य करावे, ही विनंती.

# नेत्रदानाची चळवळ आणखी जोमाने व्हावी : गोरक्ष गाडीलकर

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहाता : संपूर्ण जगभरात १० जुन जागतीक नेत्रदान दिन म्हणुन साजरा केला जातो जागतिक नेत्रदान दिवसाचे औचित्य साधुन श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात दि.१० जुन २०२५ रोजी सकाळी ११ वा. विविध उपक्रम व कार्यक्रमाचे आयोजन करणेत येवुन जागतीक नेत्रदान दिन साजरा करणेत आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी, गोरक्ष गाडीलकर ,भा.प्र.से हे होते.

यावेळी श्री साईबाबा संस्थानचे वतीने श्री साईनाथ नेत्रपेढीमध्ये नेत्रदान केलेल्या आठ नेत्रदात्यांच्या परिवारांचा सन्मान सोहळा तसेच याचबरोबर नेत्ररोपन झालेल्या ११ रुग्णांचाही यावेळी मुख्य कार्यकारी



अधिकारी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला यावेळी बोलताना गाडीलकर यांनी नेत्रदानाची चळवळ ही आणखी जोमाने पुढे नेवुन ही चळवळ घराघरात पोहचवावी असे आवाहन केले. नेत्रदात्यांच्या परिवाराच्या सत्कारावेळी मल्हारवाडी येथील नेत्रदाते कु. साहिल प्रशांत दोशी वय वर्ष–१२व कु दिव्या प्रशांत दोशी वय वर्ष–१५ या नेत्रदात्याच्या परिवारांचा आजी, आजोबा, वडील, बहीण मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे हस्ते सत्कार होताना परिवारा बरोबरच संपुर्ण सभागृह भावुक झाले. नेत्रदानासारखे पवित्र कामामध्ये दु:खामध्ये या परिवाराने दाखविलेल्या धाडसाबद्दल श्री गाडीलकर यांनी त्यांचे आभार व्यवक्त करुन त्यांच्या कार्याबाबत श्री साईबाबा संस्थानचे वतीने कृतज्ञता व्यक्त केली.याचबरोबर नेत्ररोपन झालेल्या रुग्णांनाही आपल्या भावना व्यक्त करुन श्री साईनाथ नेत्रपेढी सुरु केल्याबद्दल श्री साईबाबा संस्थानचे आभार व्यक्त केले .डॉ. अशोक गाविते यांनी नेत्रदानाचे महत्व, नेत्रदाना विषयीची माहिती यावेळी उपस्थीतांना दिली. यावेळी वैद्यकीय संचालक, लेफ्ट कर्नल, डॉ.शैलेश ओक, से.नि, उपवैद्यकीय संचालक, डॉ.प्रितम वडगावे, डॉ.अजित पाटील, डॉ.सौदामिनी निघुते, डॉ. अनघा विखे, सौ.मंदा थोरात, श्रीमती नजमा सय्यद यांचे सह. हॉस्पिटल व कर्मचारी व अधिकारी नेत्रदात्यांचे परिवार व नेत्ररोपन झालेल्या रुग्ण व रुग्णांचा परिवार यांची उपस्थीती होती. कार्यक्रमाचे प्रास्तावीक वैद्यकीय अधिक्षीका, डॉ.मैथिली पितांबरे यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रुग्णालयाचे जनसंपर्क अधिकारी, श्री. सुरेश टोलमारे यांनी केले.

# पाथर्डी टँकर व जलजीवन मिशन घोटाळ्याचा सूत्रधार अनिल सानपच ?

## अधिकारी आणि कंत्राटदाराने मिळून लाटली टँकर व जलजीवन मिशन योजनेची मलाई !

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाथर्डी : पाथर्डी तालुक्यात जवळपास २८ गावात जिल्हा परिषद अंतर्गत जल जीवन मिशन योजनेच्या ४६ ते ५० कोटी रुपये खर्च करून जलजीवन मिशनची कामे अत्यंत निकृष्ट व अर्धवट करून ठेवली आहेत त्याचबरोबर टंचाई सदृश्य काळ सन २०१८-१९,२०२३-२४,२०२४-२५ सलग तीन टर्म गाडे ट्रान्सपोर्ट पुरस्कृत गणेश मोटर पाणी वापर संस्था आणि चिंतेश्वर कंट्रक्शन या पाणी वापर संस्थेने पाथर्डी पंचायत समितीच्या ग्रामीण पाणीपुरवठा शाखा अभियंता पदावर कार्यरत असलेला मोठा आका तत्कालीन अधिकारी अनिल सानप याच्याशी लाखो रुपयांची आर्थिक डील करून या दोन्ही योजनेच्या कामात मनी लॉन्ड्री घोटाळा केला आहे याबाबत सविस्तर माहिती अशी की पाथर्डी तालुक्यात २८ गावात जिल्हा परिषदच्या माध्यमातून हर घर जल या शासनाच्या धोरणानुसार जल जीवन मिशनची कामे करण्यात आली परंतु शासनाच्या ४६ ते ५० कोटी रुपये खर्च करून २८ गावात काही ठिकाणी विहिरी खोदकाम अर्धवट अवस्थेत तर काही ठिकाणी पाण्याच्या टाक्याचे काम निकृष्ट दर्जाचे गावांतर्गत नळ कनेक्शन आणि पाईप खुदाई जमिनीत एक मीटर पेक्षा जास्त करणे अपेक्षित असताना अर्ध्या ते एका फुटावर पाईपलाईनची लाईन टाकण्यात आली सर्वात धक्कादायक बाब म्हणजे पाथर्डी तालुक्यातील आल्हनवाडी तेथे महाराष्ट्र शासनाच्या जुन्या राष्ट्रीय पेयजल योजनेची जुने टाकी सुधारित जलजीवन मिशन योजनेचे काम पूर्ण झाले असे दाखवले आणि शासनाच्या करोडो रुपये निधीवर कंत्राटदार व अधिकाऱ्यांनी डल्ला मारला असा आरोप आहे.

या अनुषंगाने जल जीवन मिशनच्या योजनेची थेट संसदेत लक्षवेधी मांडल्यानंतर केंद्रीय समितीने पाथर्डी तालुक्यातील जलजीवन मिशन योजनेची पाहणी केली चौकशी केली परंतु त्याचा अहवाल अद्याप पर्यंत समोर आला नाही जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाथर्डी तालुक्यात झालेल्या जलजीवन मिशन योजनेच्या व टंचाई सदृश्य टँकर घोटाळ्याच्या लेखी तक्रारी दिल्या असताना सुद्धा अजून पर्यंत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून पाथर्डी जलजीवन मिशन व टँकर घोटाळ्याच्या कारवाई व चौकशीसाठी वेळ का दडवला जात आहे असा प्रश्न आहे या जलजीवन मिशन व टँकर घोटाळ्यात मुख्य सूत्रधार अनिल सानप यांच्यासह पाथर्डी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील मोठे बोके अडकण्याची शक्यता असल्याने यावर ठोस निर्णय होत नाही. येणाऱ्या आठ दिवसात मंत्रालयात ग्रामीण पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील आणि ग्रामीण पाणीपुरवठा प्रधान सचिव संजय कंधारे यांना लेखी तक्रार आणि पुराव्यासहित पाथर्डी पंचायत समितीतील भ्रष्ट अधिकारी अनिल सानप यांचे प्रशासकीय सेवेतून कायमस्वरूपी निलंबन करण्यात यावे यासाठी निवेदन देणार आहोत असे सामाजिक कार्यकर्ते किसन आव्हाड यांनी सांगितले आहे.

पाथर्डी तालुक्यात २८ गावात ४६ ते ५० कोटी रुपये खर्च करून जलजीवन मिशनची कामे करण्यात आली परंतु या कामात पाथर्डी पंचायत समिती येथे कार्यरत असलेला तत्कालीन ग्रामीण पाणीपुरवठा विभाग शाखा अभियंता अनिल सानप काही कर्मचारी आणि कंत्राटदार यांनी लाखो रुपयांची मलाई लाटली आहे प्रश्न हा आहे की जुन्या राष्ट्रीय पेयजल योजनेचे काम बहुतांश गावात अर्धवट आहे पाथर्डी तालुक्यात आल्हनवाडी सारख्या बहुतांश गावात राष्ट्रीय पेयजल योजनेच्या टाक्या जलजीवन मिशनच्या आहेत असे दाखवण्यात आल्या यामुळे शासनाच्या हर घर जल या संकल्पनेला शासनाच्याच अधिकाऱ्यांनी फरताळ फासण्याचे काम केले जल जीवन मिशन योजनेचे शासनाचे ४६ कोटी खर्च करून पाथर्डी तालुक्यात कायम टंचाई राहते आजही पाथर्डी तालुक्यातल्या तांड्या वाड्या वस्त्यांवर माताभगिनींना पाण्यासाठी वन वन भटकावे लागते आणि पाण्याचे टँकर सुरू करावी लागतात हे अपयश कोणाचे आहे शासनाच्या करोडो रुपये निधीचा अपहर करणारा पाथर्डी पंचायत समितीचा बोका अनिल सानपच आहे भ्रष्ट अधिकारी अनिल सानप याला प्रशासकीय सेवेतून हद्दपार करावे.

– किसन आव्हाड ( सामाजिक कार्यकर्ते )

## चिचोंडी पाटील येथे शिवराज्याभिषेक दिन साजरा



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : शिवराज्याभिषेक दिन हा इतिहासातील डोळ्याची पारणे फेडणारा अद्भुत सोहळा आहे.या दिवशी छत्रपती शिवरायांनी हिंदू साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली. छत्रपती शिवरायांनी अखंड महाराष्ट्रात अनेक गडकोट किल्ले बांधले.परकीय शत्रू व मुघली सत्तेला लढा देऊन हिंदूधर्म टिकविला.हिंदू अस्मिता जागी केली.हिंदवी स्वराज्याचे निर्माण केले. रयतेवर चालून आलेल्या शाहिस्तेखान, अफजल खान यांना चांगलाच धडा शिकविला. तसेच मुघलांनी पाडलेल्या मंदिरांचा जिर्णोद्धार केला.छत्रपती शिवराय शिवाजी महाराज प्रजाहित दक्ष राजा होते.शिवराज्याभिषेक सोहळा हा सुवर्ण दिन आहे.असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाचे मुंबई- गोवा क्षेत्र संयोजक विवेक कुलकर्णी यांनी केले आहे.

नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील उपखंडात छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५२ वा शिवराज्याभिषेक सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.या सोहळ्यात प्रमुख उपस्थितीत विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे मुंबई-गोवा चे क्षेत्र संयोजक विवेक कुलकर्णी,हिंदू धर्मरक्षक आमदार संग्राम जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवराज्याभिषेक सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात रा.स्व.संघाचे १५० ते २०० स्वयंसेवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच महिलांचाही मोठ्या संख्येने सहभाग होता.छत्रपती शिवाजी महाराजांची पालखीची मिरवणूक गावामधून काढण्यात आली. ऑपरेशन सिंदूर मधील सहभागी जवान विशाल कोकाटे यांया हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीस पूजन व अभिषेक हस्ते करण्यात आला.

## स्व.डॉ.दादासाहेब तनपुरे यांचे जिल्ह्याच्या विकासात महत्वपूर्ण योगदान : नवले



■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : डॉ. दादासाहेब तनपुरे यांचे केवळ तालुक्याच्या नव्हे तर जिल्ह्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान राहिलेले आहे ,असे प्रतिपादन अकोला येथील जनलक्ष्मी पत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भाऊ पाटील नवले यांनी केले .

गुहा येथील प्रेरणापत व मल्टिस्टेट च्या वतीने संस्थेच्या मुख्य कार्यालयात डॉ. दादासाहेब तनपुरे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश वाबळे समारंभाचे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख भाषणात भाऊ पाटील नवले म्हणाले, डॉ. दादासाहेब तनपुरे यांनी राहुरी सहकारी साखर कारखाना उभा केला. त्याचबरोबर जिल्ह्यातील अन्य साखर कारखान्यांच्या उभारणीतही त्यांनी मार्गदर्शन केले .मुळा प्रवरा वीज सहकारी संस्था स्थापन करून आशिया खंडातील पहिला प्रयोग यशस्वी केला .तसेच मुळा धरणाच्या निर्मितीतून राहुरीच नव्हे तर जिल्ह्यात जिरायती भागाला पाणी मिळाले .त्यामुळे शेती समृद्ध झाली. व राहुरी येथे कृषी विद्यापीठ स्थापनात्यांच्या विकासाच्या कामामुळे आजही त्यांची कार्य प्रेरणादायी आहे. तनपुरे सहकारी साखर कारखान्याशी संलग्न शिक्षण संस्था उभारल्या.

त्यामुळे शिक्षणाची गंगा तालुक्यात खेड्यापाड्यात पोहोचली .यावेळी डॉ. दादासाहेब तनपुरे यांच्या प्रतिमेस उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले.

जनलक्ष्मी पतसंस्था संचालक कैलास शेळके, राहुरी तालुका ट्रक ट्रान्सपोर्टचे मा.चेअरमन आप्पासाहेब कोहकडे, संचालक ज्ञानदेव हारदे व सभासद, कर्मचारी वृंद यावेळी उपस्थित होते .आभार प्रेरणा मल्टिस्टेट व्हा.चेअरमन प्रा.वेणुनाथ लांबे यांनी मानले.

## बस स्थानकावर चोरी करणाऱ्या महिलेच्या ताब्यातुन सोने हस्तगत




■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : नगर शहरातील बस स्थानकावर चोरी करणार्या महिलेच्या ताब्यातुन चोरीच्या गुन्ह्यातील सोने हस्तगत केले

दि. ५जुन रोजी सायंकाळी ०६.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे राजश्री शिवाजी भोंडवे, रा. जामखेड, जिल्हा – अहिल्यानगर ह्या त्यांचे नातेवाईक यांचेसह पुणे बस स्थानक येथे जामखेड जाणा-या गाडीतुन जामखेडला जाण्याकरिता थांबलेल्या होत्या. त्यावेळी पुणे जामखेड मार्गे भुम ही एस.टी. बस लागल्याने फिर्यादी ह्या बस मध्ये चढत असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने बस स्थानकावरील गर्दीचा फायदा घेवुन फिर्यादी यांचे गळ्यातील १७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनीगंठण चोरुन नेले होते. फिर्यादी यांची कोतवाली पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीवरुन गु.र.नं. ५२८/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे दि. ०५/०६/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे तपास पो.हे.कॉ. विक्रम वाघमारे यांचेकडे देण्यात येवुन गुन्हे शोध पथकांचे अधिकारी व अंमलदार यांना गुन्ह्याचा समांतर तपास करुन गुन्ह्यातील अज्ञात चोरट्याचा शोध घेवुन गेला माल हस्तगत करणेबाबत आदेशीत केले होते. त्यानुसार पोलिसांनी एका संशयीत महिलेला ताब्यात घेऊन विचारपुस केली असता तीने चोरी केल्याची माहिती दिली. सदर चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यात आला असून १००% चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर चोरी करणारी महिला ही अल्पवयीन असल्याने तिला बाल कल्याण समिती, अहिल्यानगर यांचे समक्ष हजर करण्यात आले आहे.

## गोळीबार प्रकरणातील आरोपी रुग्णालयातून पसार

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : राहुरी तालुक्यातील डिग्रस येथील गोळीबार प्रकरणातील संशयित आरोपी जिल्हा रुग्णालयातून पसार झाला आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाची एकच धांदल उडाली. ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जिल्हा रुग्णालयात दाखल झाले आहेत. आरोपीच्या शोधासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत. बडतर्फ सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील लोखंडे असे पसार झालेल्या आरोपीचे नाव आहे.

राहुरी तालुक्यातील डिग्रस येथे ७ ऑक्टोबर २०२१ रोजी सामाजिक कार्यकर्त्या वैशाली नान्नोर यांच्यावर गोळीबार करुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी आरोपी सुनील लोखंडे याला पोलिसांनी ताब्यात घेतले होते. गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल असल्याने आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावली होती. मात्र त्याला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज सुनील लोखंडे पोलिसांना चकवा देत फरार झाला. त्याचा शोध पोलीस घेत आहेत.

खंडणी बहाद्दर पोलिस सेवेतून बडतर्फ झालेला पुणे येथील सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनिल लोखंडे याने राहूरी तालुक्यातील डिग्रस येथील वैशाली नान्नोर यांच्या कुटुंबाला ओलिस ठेवले. सदर कुटूंबाचे रक्षण करताना आरोपीने पोलिस अधिकाऱ्यावर गोळी झाडण्याचा प्रयत्न केला होता. आरोपी बडतर्फ पोलिस अधिकारी सुनिल लोखंडे याने डिग्रस येथे वैशाली नान्नोर यांच्या घरात घुसून पिस्तुलाचा धाक दाखवून पती-पत्नी आणि दोन मुलांना ओलीस ठेवणाऱ्या आरोपीला ताब्यात घेतांना थोडीशी चूक महागात पडली असती. मात्र तत्कालीन पोलीस उपअधीक्षक संदीप मिटके यांनी शिताफीने आरोपीला ताब्यात घेतले होते.

## राहुरी नगरपरिषद हद्दीतील समस्यांबाबत भाजपचा ठिय्या



■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : राहुरी नगरपरिषद हद्दीतील सर्व प्रभागातील नाली साफ सफाई, डास फवारणी व तणनाशक फवारणी स्ट्रीट लाईट व रस्त्याच्या समस्यां बाबत भाजपच्या कार्यकर्त्यांनी मुख्याधिकारी यांच्या दालनात ठिय्या मांडत समस्यांचा पाढा वाचला.

राहुरी येथील भारतीय जनता पार्टीच्या वतीने मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे यांना निवेदन देण्यात आले. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, नगरपरिषद हद्दीत पावसाळ्यापुर्वी जेसीबी ने गाळ काढण्यात आला होता. पण जेसीबी ने तो गाळ पुर्णपणे काढण्यात आला नव्हता आणि काढलेला गाळ पावसामुळे पुन्हा तो नाल्यांमध्ये जावुन नाल्या तुंबल्या आहेत. कर्मचाऱ्याच्या मदतीने सदर गाळ काढण्यात यावा. तसेच शहरात डासांचे प्रमाण वाढुन रोगराई पसरत आहे. नगरपालीके मार्फत अद्याप पर्यंत रोगराईची फवारणी केलेली नाही. शहरामध्ये वाढलेले गवतांवर तननाशक फवारणी अद्याप पर्यंत केली नसलेने सदरचे तन खुप मोठ्या प्रमाणात वाढले असुन त्यापासुन साप, विंचु यांचे धोका निर्माण झालेला आहे. शहरातील कचरा गोळा करणाऱ्या घंटागाड्या, कचरा उचलणारे टॅम्पो यांचेव्हरे उचलला जाणारा कचरा वेळेवर उचलला जात नाही. त्यामुळे नागरीक त्रस्थ झाले असुन सदरचा कचरा रस्त्यावर फेकला जातो. तसेच नगरपरिषद हद्दीत व ग्रामीण भागात लावलेले स्ट्रीट लाईट हे वारंवार रिपेअर करुन देखील दिवसा चालु रात्री बंद अवस्थेत आढळुन आलेले आहेत. नगर-मनमाड रोडवरील स्ट्रीट लाईट ही पुर्णपणे बंद आहे. त्याचबरोबर शहरातील रस्त्यांची झालेली दुरावस्था व तसेच रस्त्यावर साठणाऱ्या सावसाच्या पाण्याची विल्हेवाट लावण्यात यावी. आदि समस्या बाबत राहुरी येथील भाजपच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन मुख्याधिकारी यांच्या दालनात ठिय्या मांडून समस्यांचा पाढा वाचला. येत्या आठ दिवसांत सर्व समस्या मार्गी न लागल्यास भाजपच्या वतीने तिव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

यावेळी माजी उप नगराध्यक्ष आर आर तनपूरे, माजी नगरसेवक राजेंद्र उंडे, अक्षय तनपूरे, विक्रम भूजाडी, गणेश खैरे, सचिन मेहेत्रे, अजित डावखर, किशोर भूजाडी, दत्तात्रय गायकवाड, सत्यवान पासवान, सागर येवले, दिनेश उंडे, जिशान शेख, नयन शिंगी, राम शिंदे आदि उपस्थित होते.

## शास्त्रीय संगीत-नृत्य, गायनाने सजला 'गंगाधर स्वरोत्सव युव-रंग'

### युवा कलाकारांचे बहारदार सादरीकरण; स्वरनिनाद आयोजित मैफलीला रसिकांचा उदंड प्रतिसाद




■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : मनमोहक कथक नृत्य, वैविध्यपूर्ण व मधुर गायकी, राग व बंदिशींचे भाव अन ठुमरीने झालेली सांगता अशा शास्त्रीय संगीत, नृत्य व गायनाने सजलेल्या 'गंगाधर स्वरोत्सव युव-रंग'मध्ये युवा कलाकारांच्या बहारदार सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. स्वरनिनाद पुणे संस्थेच्या वतीने दोन दिवसीय शास्त्रीय संगीत महोत्सवाचे नुकतेच आयोजन केले होते. युवा पिढीतील प्रतिभावान कलाकारांना व्यासपीठ मिळवून देणारा हा महोत्सव आहे. या महोत्सवाला राहुल देशपांडे, अमोल निसळ, तेजस उपाध्ये, राजस उपाध्ये, रईस खान, अंजली दाते, गायत्री जोशी, धनंजय गोखले आणि मेहेर परळीकर यांसारख्या अनेक नामवंत कलाकारांनी उपस्थित राहून युवा कलाकारांना प्रोत्साहन केले. वृषाली निसळ यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

पहिल्या दिवशी पंडिता शमा भाटे यांच्या शिष्या ईशा नानलच्या कथक नृत्याने महोत्सवाची सुरुवात झाली. ईशाने 'वंदना', 'चौताल' (तोडे, तुकडे, तत्कार) आणि 'अभिनय पक्षात' 'एक और एकलव्य' या कलाकृती सादर करत उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या नृत्यातून कथक परंपरेची शुद्धता आणि अभिनयाची खोली दिसून आली. पंडित अजय चक्रवर्ती यांचे शिष्य अनुभव खमारूने यमन रागामध्ये विलंबित एकतालात 'सुमरन तोरा' ही बंदिश, 'झपताल'मध्ये 'चंद्रमा ललाट पर' आणि 'द्रुत एकताल'मध्ये 'गुन नाही एको' सादर केले. 'द्रुत तीन ताला'मध्ये तराणा आणि 'पिलू रागा'मध्ये 'पिया के बोल ना बोल' ही ठुमरी सादर केली.

०तबल्यावर यशद गायकी, हार्मोनियमवर अभिनय रवंदे यांनी साथ दिली. एस. आकाश यांच्या प्रभावी गायनाने पहिल्या दिवसाची सांगता झाली. रागेश्रीमध्ये आलाप, 'झपतालात' गत आणि 'तीन ताला'मधील द्रुत गत सादर केली. त्यांना तबल्यावर आशय कुलकर्णी यांनी साथ दिली.

# बाळातील आनुवंशिक आजार...



आधुनिक तंत्रज्ञानाने बाळाच्या जन्माच्या पद्धती बदलल्या आहेत. १९७८ पूर्वी टेस्टट्यूब मध्ये बाळ जन्म घेऊ शकते. याची कल्पनाही कोणी केली नसेल; परंतु आज जगात हजारो टेस्टट्यूब बेबी जन्माला येत आहेत व सामान्य माणसांसारखे जीवन जगत आहेत.

मुलांना जन्म देण्याची संपूर्ण जबाबदारी महिलांवर असते; पण मूल आईच्या गर्भाऐवजी इतर कोणाच्या गर्भातून जन्म घेऊ शकेल असे पूर्वी कोणालाही वाटले नसेल; पण आज बाळाच्या आईला गर्भधारणेची काही समस्या असेल तर अगदी आजीच्याही गर्भातून नातवांना जन्म देण्यात यश मिळवण्यात आले आहे.

मागील काही वर्षांत डीएनएचे कूट भाषेत लिहिलेले मानवी शरीराच्या जीनोमचे पुस्तक शास्त्रज्ञांनी वाचले आहे आणि जीवरूपी शब्द ओळखले आहेत. आता त्यांना कोणता जीन केस काळे बनवतो, कोणता डोळ्यांना भुरा वा निळा रंग देतो आणि कोणता शरीरातील आनुवंशिक रोगांचा कारक असतो हे माहीत असते. जर नैसर्गिक जीन शब्दात बाळाचे डोळे भुरे लिहिले असतील तर शास्त्रज्ञ सूक्ष्मतंत्राद्वारे ते बदलून नव्या जीन शब्दाने बाळाचे डोळे काळे लिहितील. याला ते जर्म लाइन थेरपी म्हणतात. या पद्धतीने ते जन्माला येणाऱ्या बाळाचे सर्व गुण बदलून हवे ते गुण भरू शकतात. अशाप्रकारे जर्मलाइन थेरपीद्वारे आपण आपल्या बाळाला सर्वगुणसंपन्न बनवू शकता.

रोगांवरील उपचारही संभव - आज भ्रूणातील अशा प्रकारच्या बदलाला वा जीन्सच्या छेडछाडीला बंदी आहे; परंतु माणसाच्या सिस्टिका फायब्रोसिस, हीमोफोलिया व मरक्यूलर डिस्ट्रॉफीसारख्या आनुवांशिक आजारांवरील उपचारासाठी जीन्सचा फेरबदल कायदेशीर दृष्ट्या वैध आहे. या तंत्राला बॉडी सेल जीन थेरपी म्हणतात. याद्वारे मुलांच्या इम्यूनो डिफिसिएन्सी विकारावर उपचार केले गेले. हा रोग फक्त एका जीनच्या गडबडीने निर्माण होतो. डॉक्टर बोन मेरो काढून एक विषाणू हानीरहीत करून त्याद्वारे बोनमेरोत निकोप जीन टाकतात व तो रुग्ण बाळाच्या शरीरात टाकतात. ही नवी मज्जा प्रतिरोधक पेशी निर्माण करण्यास सुरूवात करतात व बाळ बरे होते. वैज्ञानिक आजारांवरील उपचाराच्या या तंत्राला जर्मलाइन इंजिनीयरी वा इनहॅरिटेबल जेनेटिक मॉडिफिकेशन म्हणजेच आयजीएम म्हणतात. हे तंत्र आल्यानंतर आता कोणीही पालक आपल्या मुलांवर आनुवंशिक रोग थोपवू इच्छिणार नाहीत. या तंत्रामुळे वैज्ञानिक जसे बाळातील आनुवंशिक आजार दूर करू शकतात तसेच कमाईसाठी कॉस्मेटिक जीनियागर बनवून डिझायनर बेबी बनवण्याचा कारभार सुरू करतील; पण एक मात्र नक्की की, शास्त्रज्ञ आता आइन्स्टाइन, नेपोलियन, गांधी, हिटलर सारखा व्यक्ती आपल्या प्रयोगशाळेत निर्माण करू शकतील.

■■■

# रविवारची सुट्टी विश्रांतीची की जादा काम करण्याची



आधुनिक जीवनशैली पती व पत्नी संबंधात नुकसान आणत आहे. प्रेमाचे फार कमी क्षण त्यांना मिळत आहेत. ही वस्तुस्थिती आहे. ७९ टक्के पती-पत्नीला एकत्र फिरायला मिळत नाही, असे सर्वेक्षणाअंती दिसून आले आहे. तर १६ टक्के पती-पत्नी गेल्या ५ वर्षांत कुठंही प्रवासाला जाऊ शकलेली नाहीत.

घरातून बाहेर पडताना जो उत्साह असतो, तो संध्याकाळी घरी आल्यानंतर राहात नाही. ऊस चरख्यातून पिळून काढावा तसा सगळा उत्साह निघून गेलेला असतो. प्रवासाची दगदग, नोकरीतला ताण, बसची लाइन, धक्का-बुक्की आणि मग बसस्टॉपपासून घरापर्यंतचा चालत प्रवास यात जीव शिणून जातो. आठ तास नोकरी व चार तास प्रवास, एक तास मुलांचा अभ्यास, एक तास घरचा दिवसभराचा आढावा घेण्यात जातो. चहा-जेवणात दोन तास गेलेले असतात. रात्री पत्नी भांडीकुंडी आवरून बेडवर येते तेव्हा दमलेले पतिराज डाराडूर झोपलेले !

रविवार सुट्टीचा दिवस त्या दिवशी मंडई, बाजारहाट वगैरे असतो. सोसायटीची मीटिंग किंवा कोणतरी नातेवाईक घरी आलेला असतो. रविवारची सुट्टी विश्रांतीची की जादा काम करण्याची तेच कळत नाही. सुट्टीचा दिवस पत्नी-मुलांबरोबर आनंदने घालवावा असं कितीही ठरवलं तरी आनंदाचे क्षण गवसतच नाहीत.

दिखावा, मोठेपणा दाखवण्याचे मनात नसले तरी, सर्वांच्या बरोबरीने कातरओढ होतच राहते. मग घरी बसून ती काय करायचं म्हणून पत्नी एखादी नोकरी बघते वा घरगुती उद्योग सुरू करते. म्हणजे प्रेम सुखात पती-पत्नी मिलनात आणखी व्यत्यय. मुलांची चीडचीड. पत्नीची आदळआपट व पतीचे तोंड टाकणे सुरू होते. स्त्रिया गरीब राहू इच्छित नाहीत. त्यांना वाटते की घरात सर्व सुखसाधनं असावीत; पण दिवसेंदिवस तिच्यातलाही जीवनरस व उत्साह घटत राहतो. घरात उदासपणा येत राहतो. पूर्वी आठवड्यातून दोन-तीन वेळा पती पत्नीचा सहवास घडायचा आता तो महिन्या दोन महिन्यातून एकदा घडू लागतो. त्यातही आनंदाचा अभाव, नुसती शरीर क्रिया.

काही पती महाशय परदेशात जाऊन राहतात. दोन-दोन, तीन-तीन वर्षं येतच नाहीत, तर काही जण बंगला, पैसा, फ्लॅट यासह पत्नीला दागदागिन्यांनी नुसते मढवून टाकतात; परंतु अतिकमाईच्या नादात ते प्रेमाचे व सुख-समाधानाचे क्षण हरवून बसतात. त्यांच्याकडे प्रेम करायला वेळच नसतो. पैशाबरोबर प्रेमाचीही गरज असते हे या व्यस्त पतीराजांना कळतच नाही.

## राग आवरण्यासाठी...

आपल्याला राग का येतो याच विचार केला तर असे आढळेल की, इतर माणसे आपल्या अपेक्षेप्रमाणे वागत नाहीत. वा आपल्याला समजून घेण्याचा प्रयत्न करीत नाहीत किंवा स्थिती आपल्या नियंत्रणाबाहेर जाते म्हणून आपण रागावतो.

● अशा परिस्थितीवर आपण रागावून अपशब्द बोलणे, मारपीट करणे वा तोडफोड करणे हा उपाय आहे का, असे विचारल्यास नाही हेच उत्तर मिळेल. पण राग आवरता येत नाही म्हणून परिस्थिती चिघळते.

● यासाठी राग आवरण्यासाठी सिस्टेमॅटिक व योजनाबद्ध कार्यक्रमाची गरज असते. ज्या ज्या वेळी राग येईल त्या त्या वेळी हा कार्यक्रम अनुसरुन या घातक सवयीपासून मुक्त व्हा.

● सर्वप्रथम राग येणार नाही याचा अभ्यास करा. आपण यशस्वी होणार नाही तरी सकारात्मक पद्धतीने तो कसा व्यक्त करता येईल याचा अभ्यास करा.

● घाणेरडी भाषा व हावभाव टाळा.

● आपले शब्द आपल्या विचारातून प्रकटतात हे लक्षात घेऊन चांगल्या शब्दांसाठी चांगले विचार मनात राखा.

● आपल्या स्वत:वरील ताबा सुटतो आहे असे लक्षात येताच दीर्घ श्वास घ्या व त्या माणसा समोरुन वा जागेपासून लगेच दूर जा.

● आपले औपचारिक संबंध असलेल्या माणसाकडे जा. औपचारिक परिचय आपल्याला मर्यादित वागण्यास भाग पाडेल.

# टीकेसाठी कदाचित कारण शोधावे लागते



'कृती' जेव्हा सासरी आली तेव्हा स्वयंपाकाबाबत अगदीच कच्ची होती. त्यामुळेच जेव्हा तिचे सासू-सासरे तिचे कौतुक करीत तेव्हा तिला मनातल्या मनात अपराधी असल्यासारखे वाटे. आपल्या सासुच्या मार्गदर्शनामुळे व पाककलेच्या पुस्तकांच्या मदतीने आज कृती एक उत्तम कुक आहे. ज्याचे संपूर्ण श्रेय ती आपल्या सासू-सासऱ्यांना देते. ती म्हणते की, जेव्हा ते माझ्या बेचव स्वयंपाकाची स्तुती करीत असत तेव्हा माझ्या मनात उत्तम स्वयंपाक करण्याची इच्छा निर्माण करीत असे व सतत उत्तम स्वयंपाक करण्याची प्रेरणा देई.

माणूस अनेक भावना अनुभवतो, ज्यात प्रशंसाही महत्त्वाची असते. आपल्यातील दोष, दुर्गुण ऐकून कोणीही तणावात येतो तर प्रशंसेने त्याचा उत्साह दुणावतो; पण विनाकारण केलेल्या प्रशंसेने माणूस गर्विष्ठ व हट्टी होतो. तेच एखाद्यातील दोष सुधारण्यासाठी हुशारीने केलेल्या प्रशंसेला महत्त्वाचे स्थान असते.

सामान्यरूप असलेली गीता स्वत:च्या राहणीमानाबाबत खूपच निष्काळजी होती. त्यामुळे ती जास्तच बिचारी दिसे. आकर्षक व्यक्तिमत्त्व असलेल्या तिच्या पती राहूलने आपल्या पत्नीची बेपर्वाई पारखलीच नाही तर हुशारीने दूर ही केली. 'गीता तू मोठी बिंदी लावून कॉटन साडी व्यवस्थित नासलीस ना की खूपच सुंदर दिसतेस बघ' राहूल छोट्या छोट्या गोष्टीबाबत पत्नीचे कौतुक करून तिला मंत्रमुग्ध करीत असे. साधी गीता पतीकडून सातत्याने होणाऱ्या कौतुकाने खरोखरच स्वत:ला आकर्षक समजू लागली व स्वत:ला सुधारू लागली. कित्ती पार्टीत जेव्हा तिला 'पार्टी क्वीन' चा पुरस्कार मिळाला तेव्हा तिने त्याचे श्रेय राहूलला दिले. प्रशंसा करण्यामागे त्या कार्यकुशलतेचे कौतुकच नव्हे तर खास व्यक्तीबाबत भावप्रदर्शन ही असते. सुमितने आणलेली जुन्या फॅशनची साडी वसुधा आजही आनंदाने नेसते. पाहणाऱ्यांनी काहीही बोलले तरी त्या साडीत वसुधाच्या भावना गुंतलेल्या आहेत. कारण तिच्या पहिल्या



वाढदिवसाला ती तिच्या पतीकडून भेट मिळलेली होती. दुसरीकडे आपल्या भावनांचा आदर पाहून सुमितचे वसुधा वरील प्रेम जास्तच उचंबळून येते.

टीकेसाठी कदाचित कारण शोधावे लागते पण प्रशंसा करण्यासाठी प्रत्येकाकडे नक्कीच काही ना काही कारण असते पण आपण टीका करायला नेहमी तत्पर असलामुळे काही बाही कारणे शोधतच राहातो. पण जेवढ्या वेळा आपण जास्त टीका करतो. तेवढ्या वेळा आपण जास्तीत जास्त खुजे होत जातो; पण तारीफ करताना आपण जास्त आनंदी, उदार व मोठे होत असतो. याचाच अर्थ तारीफ, प्रशंसा वा कौतुक दोहोंच्याही फायद्याची असते. ज्याचे केले जाते त्याच्याही व जो करतो त्याच्याही.

# आपला पोशाख कसा असावा



ज्या महिलांची शरीरयष्टी सामान्य मापात नाही त्यांनी आपण कसा पोशाख केल्यामुळे आपल्या शरीरातील दोष झाकले जातील व गुण उजळता येतील याचे भान राखायला हवे. अशा महिलांसाठी काही उपयुक्त टिप्स.

**छोटी व जाड मान असल्यास**

अशावेळी गोल गळ्याचा पोशाख न घालता व्ही शेपच्या गळ्याचा पोशाख घालावा.

**जादा उंच व सडपातळ मान असल्यास**

अशा महिलांनी गोल गळ्याचा पोशाख घालू नये. त्यामुळे मान जास्त उंच दिसेल. यांना कॉलर गळ्याचा पोशाख सुंदर दिसतो. शिवाय उंचीही कमी दिसते.

**जाड शरीरावर**

सुती, कोटा वा खळीचा पोशाख घालू नये. जादा घट्ट वा पातळही साडीही नेसू नये. कारण अशा पोशाखातून जाड व बेढब शरीर दिसते. आपण सिल्क, सिफॉन,जॉर्जेट व बिनखळीचे कॉटन ड्रेस घालू शकता.

उंची कमी असल्यास

छोट्या प्रिंट्सचे व उभ्या लायसिंगचे पोशाख करावेत.

खांदे झुकलेले असतील तर

अशा शरीरावर खांद्याची शिवण थोडी मागे राखल्यासारखे पोशाख फिट वाटतो. स्वत: खांद्याचे माप देऊन पोशाख तयार करवावा. पोशाखाचा गळा आकर्षक करुनही झुकलेल्या खांद्याचा दोष लपवता येऊ शकतो.

**दंड स्थूल असल्यास**

अवाजवी स्थूल असलेल्या दंडावर स्लीव्हलेस पोशाख शोभत नाही. लांब वा पफच्या बाह्यांचा पोशाख आपल्याला शोभून दिसेल.

**पोट मोठे असल्यास**

अशा शरीरावर कधीही अंगाला चिकटणारा पोशाख घालू नये. उभ्या लायनिंगचा पोशाख घातल्याने पोटही कमी दिसेल. शक्यतो पोशाखाचा वरचा म्हणजे गळ्याचा भाग आकर्षक करावा म्हणजे इतरांचे आपल्या पोटाकडे कमी लक्ष जाईल.

■■■

## जगाची ओळख

जगातील सर्वात मोठी मूर्ती
**–रशियातील मदरलँडची मूर्ती**
जगातील सर्वात लांब नदी
**– नाईल नदी**
जगातील सर्वात मोठी भिंत
**– चीनची भिंत**
जगातील सर्वात मोठा ज्वालामुखी
**–मोनालिया**
जगातील सर्वाधिक पाऊस पडणारे क्षेत्र
**– भारतातील चेरापुंजी**
जगातील एकमेव रडणारे झाड
**– लारेल**
जगातील सर्वात मोठा रस्त्यांवरील बोगदा
**– स्वित्झर्लंडमधील गोथार्ड पर्वताचा**
जगातील सर्वात लांब कालवा
**– सुएझ कालवा**
जगातील सर्वात उंच धरण
**– रशियातील रिगूवटकी धरण**
जगातील सर्वात उंच प्रदेश
**– तिबेट**

# माणसाचा सभ्यपणा व शालीनता त्याच्या साधेपणातूनच झळकते



विवेकी माणसे वरपांगी वस्त्रालंकारापेक्षा आंतरिक गुणानांच माणसाचा मापदंड मानत असतात. माणसाचा सभ्यपणा व शालीनता त्याच्या साधेपणातूनच झळकत असते.

सदाचाराचा आणि साध्या राहणीमानाचा परस्परांशी घनिष्ठ संबंध असतो, त्यामुळे जेथे साधेपणा असतो तेथेच सत्कर्मंही असते. कसलाही दिखावा न करता आपल्या वास्तव स्थितीत अखेरपर्यंत राहून माणूस आपले नैतिक बळही प्रदर्शित करीत असतो.

हल्लीच्या परिस्थितीत वास्तव प्रदर्शनासाठी थोडा संकोच वा अडचण वाटणे स्वाभाविक आहे; पण एकाच स्थितीत सुखी, समाधानी जीवन जगण्यासाठी आपल्या स्थितीवर व स्तरावर आक्रमण न करणे हा सर्वोत्तम मार्ग आहे. गरीब असणे पाप नाही; परंतु येन-केन-प्रकारणे गरिबी लपवून श्रीमंतीची झूल पांघरण्याचा प्रयत्न केला जातो; पण गरिबी तशीच असते. उलट यामुळे तर अडचणी, समस्या तोंड वर काढतात. निर्धनतेची टर काही दिवस उडवली जाते; पण खोटं सोंग संपूर्ण आयुष्यावर परिणाम करते व खऱ्या स्थितीला अधिक दयनीय बनवते.

जोपर्यंत खोट्याचा वापर बोलण्या-चालण्यापुरता होत असतो तोपर्यंत त्यामुळे विशेष नुकसान होण्याची शक्यता नसते; परंतु ठरवून, नियोजनपूर्वक असल्याचा परिणाम असामान्य होतो. त्याचे क्षेत्र व्यापक असते. यासाठी आपण ज्या स्थितीत आहोत त्या स्थितीत इतरांसमोर राहायला हवे.

त्यात आपली व समाजाची दोहोंची भलाई आहे. खोटे बोलून, अवडंबर माजवून व स्वतःला इतरांसमोर बेगडी स्वरूपात मांडून वास्तवता संपत नसते. फक्त प्रदर्शन करून आपले वागणे वा कुशलता वाढत नसते.

खरे तर जो पैसा आपण खोट्या प्रतिष्ठेसाठी-प्रदर्शनासाठी खर्च करीत असतो, तो त्याची खरी गरज असलेल्या ठिकाणी वापरला, तर ते जास्त उपयुक्त ठरेल. तसेही जादा अवडंबर करण्यापेक्षा शिष्टाचार, सभ्यता व शालीनता जास्त महत्त्वाची असते. यासाठी आर्थिक स्तर असो वा बौद्धिक वा इतर कोणतेही क्षेत्र, नेहमी वास्तवतेत जगा व खरा आनंद मिळवा.

# वजन आटोक्यात ठेवण्यासाठी...



वजन आटोक्यात ठेवण्यासाठी तुम्हाला व्यायाम व डायटवर विशेष लक्ष द्यावे लागेल. अशाप्रकारे तुम्ही वाढत्या वयासोबत स्वत:ला तंदुरुस्त ठेवू शकता.

वय वाढण्यासोबत वजन सुद्धा वाढते. विशेषत: मध्यम वयात सर्वांना वजन वाढीचा सामना करावा लागतो. याचे कारण हेल्थ एक्सपर्ट्स शरीरारात कमी कॅलरी बर्न करणे सांगतात. एका संशोधनानुसार, ज्या दराने आपले शरीर कॅलरी बर्न करते, ती क्षमता दर १० वर्षानंतर ५ टक्क्याने कमी होते. जर तुम्ही आजही तितकेच जेवण करत असाल जितके काही वर्षापूवी करत होते तेव्हा निर्विवादपणे तुमचे वजन वाढेलच. यातून मुक्त होण्यासाठी तुम्हाला काही गोष्टी अंमलात आणाव्या लागतील.

**व्यायाम करा**

वजन आटोक्यात ठेवण्यासाठी दररोज व्यायाम करा. यामुळे तुमचे हार्ट वेगाने पंपींग करेल ज्यामुळे कंबरेचा घेर व शरीराचे वजन कमी होईल. जर तुम्ही सकाळी फिरायला जात असाल तर फिरण्याचा वेळ काही मिनिटांनी वाढवा. शक्य तेवढ्या वेगाने चालावे. ट्रेडमिलला थोड्या उंचीवर ठेवा ज्यामुळे तुम्ही जॉगिंग करु शकाल. दररोज १ तास व्यायाम केल्याने तुमचे वजन वाढणार नाही.

**कॅलरी फ्री ड्रिंक घ्या**

या वयात तुम्हाला खुप पार्ट्यांना जावे लागते तरीसुद्धा अल्कोहल पुर्णपणे बंद करा. खरं म्हणजे कॅलरीज पार्ट्यांमुळे जास्त वाढतात. जर तुम्ही अल्कोहल कमी केले तर तुमचे वजन आपोआप कमी होईल. तुम्ही अल्कोहल ऐवजी दुसरे कॅलरी फ्री ड्रिंक घेऊ शकता

**फळ व भाज्या खा**

या वयात फळ व भाज्या खुप आवश्यक आहेत. जर तुम्ही दररोज फळ व भाज्या खाल्ल्या तर जंक फुड खाण्यासाठी तुम्हाला भूकच लागणार नाही. मग फळ व भाज्या खाल्ल्याने शरीरात फायबर, विटॅमिन, मिनरल्सचा तुमच्या शरीरात समतोल राहिल. यामुळे तुम्ही सुदृढ बनाल व तुमचे वजनही कमी कराल. काही काळ दिवसभरात किंती प्रमाणात फळ व भाज्या खायच्या याची यादी बनवा. मग नियमित डायट गरजांचा चार्ट बनवा व त्याची अंमलबजावणी करा.

# मुलांना वळण लावणे अत्यंत आवश्यक असते



बऱ्याचदा मुलांवर रागावण्यामागे त्यांची काहीच चूक नसते. आपणच त्यांच्याकडून अवास्तव अपेक्षा करत असतो. मुलांचे स्वत:चे असे वेगळे व्यक्तिमत्व आहे. याचाच पालकांना विसर पडतो. ते त्यांच्यावर आपल्या इच्छा, आवडी-निवडी थोपवण्याचा प्रयत्न करतात व त्यात आलेल्या अपयशाने रागावतात.

मुलांना वळण लावणे अत्यंत आवश्यक असते. पण त्यापूर्वी आपली पध्दत पडताहळून पाहायला हवी. उदा. मुलांनी मागितलेल्या क्षुल्लक गोष्टी न नाकारता त्यांना आपण देऊ शकतो. नकळत घडणाऱ्या व क्षुल्लक चुकांबाबत रागावण्याऐवजी यापुढे लक्षपूर्वक कर असे समजावता येते. यामुले मुलांना त्यांच्या चुका समजतील व चांगल्या पध्दतीने वागण्याचा ते प्रयत्न करतील.

मुलांचा स्वाभिमानही पालकांनी लक्षात घ्यायला हवा. शिक्षा म्हणून त्याला दिल्या जाणाऱ्या सोयींध्ये कपात करता येते. उदा. पॉकेटमनी कमी देणे, टीव्ही पाहायला वा खेळायला न पाठवणे इ. उपाय आजमावता येतात.


मुलांच्या पालनपोषणात पालकांच्या धैर्याची परीक्षा असते, हेच धैर्य मुलांच्या व्यक्तिमत्व विकासाला मदत करते.

मुले चुकल्यानंतर प्रत्येकवेळी मारूनच ती सुधारत नसतात. कित्येकदा त्यांच्या चुकांकडे व अवाजवी मागण्यांकडे दुर्लक्ष करणेही हिताचे ठिरते. मुलांना त्यांच्या चुका कशा समजाव्यात ते पाहू.

वास्तविक एका टोकाला पाहोचल्यानंतर पालकांचा स्वत:वरील ताबा सुटतो. मुलांना शिस्त कशी लावावी हेच कळत नाही व नकळत त्यांचा मुलांवर हात उठतो. परंतु मुलांच्या नजरेतून पाहिले तर अशा शिस्तीचा व माराचा बडगा दाखवणारे आई-वडील शत्रूपेक्षा कमी वाटत नाही.

मुलांच्या चुकांबद्दल उत्तेजित होऊन प्रतिक्रिया व्यक्त केल्यामुळे मुले घाबरून जातात व आपल्याला का रागावले वा मारले जात आहे हेही त्यांना कळत नाही. कारण रागाच्या भरात मूळ समस्याच बाजूला पडते.

# हाताची नखे पायांच्या नखांपेक्षा चौपटीने वाढतात



मानवी शरीराची रचना एवढी गुंतागुतींची आहे की, शास्त्रज्ञांना अद्याप हा गुंता पूर्णपणे उलगडता आलेला नाही. त्यामुळेच आजही शरीरात निर्माण होणाऱ्या अनेक व्याधींवरील उपचार शोधता आलेले नाहीत. मानवी शरीरातील अशीच काही नवलाईची माहिति करुन घेऊ या...

● पृथ्वीवरील मानवांच्या संख्येपेक्षा एका मानवी शरीरावरील सूक्ष्म जीवांची संख्या जास्त असते.

श्र एक माणूस एका दिवसात सुमारे १७ हजारवेळा पापण्या फडफडवतो.

● मानवी शरीरातील डोळ्यांचा आकार जन्मापासून मरेपर्यंत एकसारखाच राहतो. तो कधीही बदलत नाही.

● निरोगी नखे दरवर्षी सुमारे २ सेंटीमीटर वाढतात. हाताची नखे पायांच्या नखांपेक्षा चौपटीने वाढतात.

● मानवी शरीरात दर सेकंदाला सुमारे १५ मिलीयन तांबड्यापेशी तयार होऊन नष्ट होत असतात.

● आश्चर्य म्हणजे दर मिनिटाला मानवी शरीरातून ४० हजार मृतपेशी बाहेर पडत असतात. आपल्या घरातील धुळीत ७० टक्के शरीरातून पडलेल्या पेशी असतात.

● एखाद्या व्यक्तीच्या डोक्यावर सरासरी १ लाख केस असतात. प्रत्येक केस वर्षभरात पाच सेंटीमीटर वाढतो.

● अंतराळ प्रवासाहून परतल्यानंतर अंतराळ प्रवाशाची उंची दोन इंच वाढते. कारण शून्य गुरुत्वाकर्षणात त्याच्या कण्याची कार्टिलेज डिस्क वाढते.

● श्वासामार्फत घेतलेल्या ऑक्सिजनपैकी २५ टक्के ऑक्सिजनचा उपयोग माणूस घेतो.

● मानवी मेंदूत ८० टक्के पाणी असते.

● एका माणसाला झोप येण्यासाठी सरासरी ७ मिनिटे वेळ लागतो.

● सर्व सजीवांमध्ये फक्त माणूसच उताणा झोपतो.

● तोंड पूर्णपणे सुकले तर कोणत्याही पदार्थाची चव कळू शकत नाही.

●●●

# हे हिरवं पान रातोरात दाखवतं केसांवर जादुई बदल, या पद्धतीने लावा

## गुच्छाने केस गळणं थांबेल व भराभर उगवतील नवे केस

आंब्याची हिरवीगार पानं गावाला तर झाडावर अगदी फ्री मध्ये मिळतात आणि मुंबईमध्येही सहज उपलब्ध होतात. या पानांचा इतक्या पद्धतीने वापर करता येतो की ज्याचा तुम्ही स्वप्नातही विचार केला नसेल. लगेच जाणून घ्या आणि केसगळती थांबवून वाऱ्याच्या वेगाने केसांची वाढ बघा.

आंब्याचा संपूर्ण झाडाचे फळांपासून ते पानांपर्यंत अनमोल औषधी उपयोग आहेत. आंबा खाल्ल्यावर शरीराला पोषण मिळतंच, पण तुम्हाला माहिती आहे का की आंब्याच्या पानांचाही केसांच्या आरोग्यासाठी अतिशय उपयोग होतो? आजकाल केसगळती, मुळं कमजोर होणे, स्कॅल्प कोरडा पडणे, केसांची वाढ थांबणे अशा समस्या फारच सामान्य झाल्या आहेत. बाजारात मिळणारी महागडी उत्पादने यावर तात्पुरती मदत करतात, पण त्यातील रसायनांमुळे दीर्घकालीन नुकसान होण्याची शक्यता असते.

म्हणूनच, केमिकल्सपासून दूर जाऊन नैसर्गिक आणि पारंपरिक उपायांकडे वळणं हेच शहाणपणाचं ठरतं. आणि यात आंब्याची पाने एक चमत्कारी पर्याय ठरतात. या पानांमध्ये अँटीऑक्सिडंट्स, अँटीबॅक्टेरियल आणि अँटीइन्फ्लेमेटरी घटक असतात, जे केसांचं सौंदर्य फुलवतात आणि आरोग्य टिकवतात.

**आंब्याच्या पानांचा हेअर मास्क**

केसगळतीमुळे त्रस्त असाल तर बाजारातले मास्क वापरण्याऐवजी आंब्याच्या पानांचा घरगुती हेअर मास्क वापरून पाहा. या मास्कसाठी १०–१५ ताजी आंब्याची पाने, थोडंसं १ कप पाणी आणि खोबरेल तेल किंवा ऑलिव्ह ऑईल लागेल. ही आंब्याची पाने मिक्सरमध्ये वाटून घ्या आणि थोडं पाणी घालून त्याची जाडसर पेस्ट तयार करा. त्यात एक चमचा खोबरेल किंवा ऑलिव्ह ऑईल मिसळा आणि केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत लावा. ३०–४५ मिनिटांनी धुऊन टाका. आठवड्यातून एक दोनदा हा मास्क वापरल्यास केसांची मुळं बळकट होतात आणि केसगळती कमी होते. त्यासोबतच डोक्याची त्वचाही स्वच्छ आणि निरोगी राहते.

**आंब्याच्या पानांचे पाणी**

डोक्याच्या त्वचेला टवटवीत ठेवायचं असेल आणि केस चमकदार हवे असतील तर आंब्याच्या पानांचे पाणी एक उत्तम उपाय आहे. १५–२० ताजी पाने २–३ कप पाण्यात चांगली उकळून घ्या. पाणी उकळवून घेतल्यानंतर त्या पानांचा रंग बदलत नाही आणि पाणी



आटून कमी होत नाही तोपर्यंत हे पाणी गरम करून घ्यावे. मग पाणी गाळून घ्यावे. शॅम्पूनंतर हे पाणी केसांवर ओता आणि तसेच सोडा, परत धुवू नका. यामुळे स्कॅल्पमधील जंतू नष्ट होतात, मुळं मजबूत होतात आणि केसांना नैसर्गिक चकाकी मिळते. नियमित वापरल्यास केसांचा पोत सुधारतो आणि त्यांना मऊपणा मिळतो.

**आंब्याच्या पानांचे तेल**

मऊ, जाडसर आणि निरोगी केस हवे असतील तर आठवड्यातून दोनदा आंब्याच्या पानांचं घरगुती तेल लावणं फायदेशीर ठरतं. १०–१५ पाने खोबरेल तेल किंवा ऑलिव्ह ऑईल टाका आणि गॅसवर मंद आचेवर उकळा. पानांचा रंग काळा होईपर्यंत तेल उकळा. मग थंड करून गाळा आणि बाटलीत साठवा. हे तेल केसांच्या मुळांमध्ये चांगलं शोषलं जातं आणि त्यांना पोषण देतं. यामुळे केसांची वाढ होते, टोकं उघडणं थांबतं आणि मुळं मजबूत होतात.

**टाळूसाठी अँटीबॅक्टेरियल ट्रीटमेंट**

आंब्याच्या पानांमध्ये नैसर्गिक अँटीबॅक्टेरियल आणि अँटीइन्फ्लेमेटरी गुणधर्म असतात. त्यामुळे स्कॅल्पवरील बुरशी, खवखव, खाज, डँड्रफ यांसारख्या समस्यांवर त्यांचा वापर अत्यंत प्रभावी ठरतो. हे गुणधर्म स्कॅल्पची स्वच्छता करतात आणि त्वचेला बॅक्टेरिया–मुक्त ठेवतात. बाजारात मिळणारे अनेक टॉनिक्स आणि लोशन्स हाच परिणाम देण्याचा दावा करतात, पण त्यातील रसायनं स्कॅल्पला अजून खराब करू शकतात. आंब्याच्या पानांनी तयार केलेल्या नैसर्गिक उपायांनी मात्र ही कामगिरी बिनधास्तपणे केली जाते.

**घरच्या घरी, स्वस्तात आणि रसायनमुक्त उपाय**

सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे हे सगळे उपाय तुम्ही घरच्या घरी, स्वस्तात आणि अगदी नैसर्गिक पद्धतीने करू शकता. बाजारातले हेअर मास्क, सीरम, ऑईल्स हे महागडे तर असतातच, पण त्यांचे दुष्परिणाम नंतर दिसतात. आंब्याच्या पानांचे हे मास्क, पाणी आणि तेल मात्र कोणतेही साईड इफेक्ट्स न देता केसांची काळजी घेतात. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांसाठी हे उपाय सुरक्षित आहेत. विशेषतः ज्यांना सतत केस गळती किंवा स्कॅल्पचे विकार होतात, त्यांनी हे उपाय नियमित सुरू ठेवावेत.

टिप : हा लेख केवळ सामान्य माहितीच्या उद्देशाने आहे. हा वैद्यकीय सल्ला, निदान किंवा उपचारांचा पर्याय नाही. अधिक तपशीलांसाठी नेहमी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# उन्हाळ्यासह पावसाळ्यातही येतात घामोळे, पुरळ? आंघोळीच्या पाण्यात 'या' २ गोष्टी मिसळा

सध्याच्या या उन्हाळी, पावसाळी हंगामात घामोळे येणे, पुरळ येणे किंवा जळजळ होणे आणि त्वचेशी संबंधित समस्या अगदी सामान्य होतात. तीव्र सूर्यप्रकाश वाढणारी उष्णता आणि घाम येणे तसंच मध्येच पाऊस पडणे यामुळे त्वचेवर पुरळ उठणे, खाज सुटणे, जळजळ होणे आणि लालसरपणा यासारख्या समस्या येणे स्वाभाविक आहे. अशा परिस्थितीत, जर आंघोळीच्या पाण्यात काही खास नैसर्गिक गोष्टी टाकल्या तर ते त्वचेला थंड आणि आराम देतेच, शिवाय त्वचेच्या अनेक समस्यांपासूनही वाचवते. आंघोळीच्या पाण्यात घालून तुम्ही तुमची त्वचा निरोगी आणि सुंदर बनवू शकता अशा दोन गोष्टींबद्दल जाणून घेऊया.

**लिंबाचा रस**

लिंबू हे नैसर्गिक अँटीसेप्टिक आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्मांनी समृद्ध असलेले फळ आहे. जर तुम्ही आंघोळीच्या पाण्यात लिंबाच्या रसाचे २–



३ थेंब टाकले तर ते तुमच्या त्वचेचे छिद्र साफ करते आणि घामाचा वास देखील कमी करते. लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, ज्यामुळे त्वचा ताजी आणि चमकदार होते. याशिवाय, लिंबाचा रस त्वचेवरील तेल नियंत्रित करतो आणि मुरुमे किंवा डाग कमी करण्यास मदत करतो. लक्षात ठेवा की लिंबाचा रस थेट त्वचेवर लावू नका, तर तो आंघोळीच्या पाण्यात मिसळा जेणेकरून त्वचेवर जळजळ होणार नाही.

**कापूर**

आंघोळीच्या पाण्यात कापूर वापरल्याने त्वचा थंड होते. कापूरमध्ये अँटीसेप्टिक आणि थंडावा देणारे गुणधर्म असतात, ज्यामुळे खाज सुटणे, जळजळ होणे आणि उष्णतेच्या पुरळ यासारख्या समस्या दूर होतात. आंघोळीच्या पाण्यात कापूर टाकल्याने त्वचेवर साचलेली धूळ आणि घाम पूर्णपणे स्वच्छ होतो. ते त्वचेला थंडावा देते आणि उष्णतेमुळे होणाऱ्या जळजळीपासून आराम देते. याशिवाय, आंघोळीच्या पाण्यात कापूर वापरल्याने दुर्गंधी दूर होते आणि त्वचा ताजी राहते.

**कसा कराल वापर?**

सुमारे अर्धा लिटर आंघोळीचे पाणी घ्या आणि त्यात २–३ थेंब लिंबाचा रस आणि ३–४ ग्रॅम कापूर मिसळा. या पाण्याने शरीर धुवा किंवा आंघोळ करा. दररोज हा उपाय केल्याने तुमची त्वचा मऊ, स्वच्छ आणि निरोगी राहील. यामुळे उष्णतेमुळे होणाऱ्या त्वचेच्या समस्या जसे की घामोळे, पुरळ, खाज सुटणे, जळजळ आणि लालसरपणा बऱ्याच प्रमाणात कमी होईल. लिंबू आणि कापूरचे हे मिश्रण वापरल्याने त्वचेच्या समस्यांमध्ये आराम मिळतोच, शिवाय स्किन पिगमिंटेशन कमी होतात आणि त्वचेला नैसर्गिक चमक मिळते. या घरात सहज उपलब्ध असलेल्या गोष्टी आहेत, ज्या कोणत्याही दुष्परिणामांशिवाय वापरता येतात. जर तुमची त्वचा संवेदनशील असेल तर प्रथम ते लहान भागावर वापरून पाहा.

# गर्भवतीला हवा पौष्टिक आहार, तोही प्रेमाने



गर्भवतींच्या त्या काळातील परिस्थितीचा, विचाराचा व वातावरणाचा परिणात तिच्या पोटी असलेल्या संततीवर होत असतो. याचे भान गर्भवतीच्या कुटुंबियांना असायला हवे; विशेषत: तिच्या पतीला.

गर्भवती महिलेला प्रोटीन व लोह पदार्थांनी परिपूर्ण पौष्टिक आहाराचीही गरज असते. यासाठी दूध, लोणी व हिरव्या पालेभाज्या तिच्या आहारात असायला हव्यात. मुळा, गाजर, टोमॅटो, गाजर यासारके कार्बोहायड्रेट्स, प्रोटिन्स व व्हिटॅमिनयुक्त अन्नही द्यायला हवे

गर्भवती महिला जर मांसाहारी असेल तर वळोवेळी मटण, मासे व अंडीही देऊ शकता. परंतु अंडी व मटण जास्त प्रमाणात देऊ नये ते तिच्या व तिच्या बाळाच्या आरोग्याला हानीकारक असते. या आवश्यक खाद्य पदार्थांशिवाय गर्भवती महिलेला रात्री झोपण्यापूर्वी सफरचंद, संत्री, मोसंबी, पपई, द्राक्षे अशी प्रोटीनेयुक्त फळे मोसमानुसार खाण्यास द्यावीत. जेणेकरुन खाद्यपदार्थांव्दारे ज्या पौष्टिक घटकांची पूर्तता होत नसेल ती फळाव्दारे करता येऊ शकते.


**लोकार्थ अर्बन निधी लि.**

**सुरजनगर,शिरुर,जि.पुणे ४१२२१० फोन नं.९९६०८४६२६८**

जावक क्र.१ दिनांक १२/०६/२०२५

**जाहिर नोटीस**

अर्जदार : साळवे गणेश ज्ञानदेव

तुमच्या सोनेतारण कर्जाची मुदत २८/१०/२०२४ ला संपलेली आहे तुमचा कुठलाही संपर्क नाही. जाहिरात दिल्यापासून ८ दिवसांत सोने घेऊन जावे अन्यथा लिलाव करण्यात येईल.

कळावे,

सही/–

शाखा व्यवस्थापक


## छान छान गोष्टी... स्वावलंबन

एका चंडोल पक्ष्याने एका भरलेल्या शेतात आपले घरटे केले. कोवळी कोवळी कणसे खायला घालून तिने आपल्या पिलांना वाढविलं. त्यांच्या डोक्यावर तुरे फुटून ती उडण्याइतकी झाली. एक दिवस शेताचा मालक पीक पाहण्याकरिता आला. पीक तयार झालेले पाहून तो म्हणाला, आता कापणीची वेळ झालेली दिसते तेव्हा आता कापणीकरिता आपल्या सर्व मित्र मंडळींना बोलविले पाहिजे.

संध्याकाळी हे बोलणे चंडोल पिलाने आपल्या बापाला सांगितले आणि तो म्हणाला, बाबा, आता आपल्याला नवं घर शोधायला पाहिजे. इथून हललं पाहिजे. इतक्यात जाण्याची जरुरी नाही. बाप म्हणाला, आणखी काही दिवसांनी मालक पुन्हा शेतावर आला. सूर्याच्या उन्हाने वाळून धान्याची कणसे जमिनीवर पडायच्या बेतात आली होती. ते पाहून तो म्हणाला, उद्या मजूर आणि कामगार बोलावून कणसाची कापणी करून टाकली पाहिजे. ती बातमी ऐकल्यावर चांडोल आपल्या मुलांना म्हणाला, मित्रावर अवलंबून राहण्याऐवजी तो आता स्वत: काम करणार. आता मात्र इथे थांबून चालणार नाही. दुसरी जागा शोधली पाहिजे.

**तात्पर्य : स्वावलंबन केव्हाही चांगले. जो दुसऱ्यावर अवलंबला, तो थांबला.**

# स्मितहास्याचे टॉनिक घ्या व तरुण व्हा

महिलांना घरी, दारी नातेवाईकांत, ऑफिसमध्ये सर्वच ठिकाणी सक्रिय राहावे लागते. अशा वेळी महिलांनी फिट राहणे अत्यंत जरुरीचे असते. त्यांचे व्यक्तीमत्व नेहमीच आकर्षक, टवटवीत इतरांना हवेहवेसे वाटले पाहिजे. त्यासाठी प्रथम त्यांनी निरोगी राहाणे आवश्यक आहे आणि राहणेही निरोगीपणाचे रहस्य आहे.

आपल्याला जर पुन्हा तरुण व्हायचे असेल वा तरुणच राहायचे असेल, तर आजपासून स्मितहास्याच्या टॉनिकशी अतूट नाते जोडा. हसणे कधीही फायदेशीर असते.

प्लीज हसा ! आपल्या सौंदर्यासाठी, आपल्यासाठी, आपल्या मित्रमैत्रिणीसाठी अहो, हसरा चेहरा कोणाला आवडत नाही. चेहरा कितीही आकर्षक आणि कितीही सुंदर असला, तरी त्यावर हलकेसे स्मित नसेल, तर तो खुलत नाही. आरोग्यासोबतच आपल्या व्यक्तीमत्व विकासासाठीही आपले गोंडस स्मित अत्यंत आवश्यक असते.

स्मितहास्य आपल्या प्रत्येक रुपात लोभसवाणे असते. एखाद्या अपरिचिताशी मैत्री सुरु करायची असो वा आपल्या माणसांतील गैरसमज दूर करायचे असोत. जर आपण लक्ष दिले असेल, तर आपले मंदस्तिम समोरच्या माणसावर जादू करीत असते. आणि न जाणो या स्मितहास्याचे रुपांतर खळखळत्या हास्यात होईल व त्यामुळेही आपलाच फायदा होईल. कारण खळखळून हसल्यामुळे संपूर्ण शरीरातील मज्जासंस्था, स्नायू, फुफ्फुसे व रक्ताभिसरण उत्तमरित्या काम करु लागेल. सर्वांत महत्वाचे म्हणजे हसण्यामुळे ताणलेले स्नायू सैल होतात. ज्या लोकांच्या चेहऱ्यावर नेहमी हास्य विलसत असते त्यांच्या चेहऱ्यावर तेज आणि ताजेपणा विलसत असतो. चमकदार चेहऱ्यामुळे ते इतरांपेक्षा वेगळे उठून दिसतात. स्तिहास्याचे इतरही अनेक फायदे आहेत. उदा. आपल्या मंदस्तिमुळे इंटरव्ह्यूच्या वेळी आपला आत्मविश्वास प्रकट होत असतो. याउलट उदास, दुर्मुखलेल्या चेहऱ्याच्या माणसाजवळ फिरकणेही टाळले जात असते.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकाना विशेषत: गांव मौजे पिंपळवंडी, चाळकवाडी (शिंदे– बाम्हणे मळा), ता. जुन्नर,जि.पुणे व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,आमचे अशिल श्री.राजु मधुकर बाम्हणे यांची वडीलोपार्जित शेत जमीन मिळकत ही गाव मांजे चाळकवाडी (शिंदे– बाम्हणे मळा),ता.जुन्नर,जि.पुणे येथील खाते नंबर ८०४ वरील जमीन गट नं. १९९/२/क, क्षेत्र ०० हे. ९९ आर ही मिळकत आहे. सदर मिळकतीतमध्ये आमचे अशिलांचे वडील श्री. मधुकर होनाजी बाम्हणे यांच्या नावे सामाईक क्षेत्रात हिस्सा व हक्क असुन सदर त्यांच्या हिश्याचे जमीनीचे क्षेत्रास कुलमुखत्यार म्हणुन आमचं अशिलांना नेमलेले आहे. सदर शेतजमीन मिळकतीमध्ये घर बांधण्याचा आमचे अशिलांचा मानस असल्याने जर कोणत्याही व्यक्तीला सदर बांधकामासाठी हरकत, आक्षेप, दावा किंवा इतर कोणतीही तक्रार असल्यास तो खाली दिलेल्या पत्त्यावर स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या पासुन पंधरा दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात कळवावी. सदर मुदतीमध्ये कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत,आक्षेप, दावा किंवा इतर कोणतीही तक्रार आली नाही तर त्यास कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप नाही आणि त्या पुर्ण संमती आहे असे गृहित धरले जाईल व त्यानंतर मात्र सदर जागेवर घर बांधकामावर कोणाचाही कोणत्याही स्वरूपाचा हरकत, आक्षेप, दावा किंवा इतर कोणतीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही कसल्याही प्रकारची फसवणुक होवु नये म्हणुन सदरचे जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस.

सही/–
नोटीस देणार तर्फे
अॅड. प्रतिक ज्ञानदेव जाधव
बोरी बु ता.जुन्नर,जि.पुणे
मोबा नं. ९५०३८९५०२६


# फक्त दोन महिने दररोज ७,००० पावले चालल्यास शरीरात दिसतील 'हे' मोठे बदल, तज्ज्ञ सांगतात

दररोज ७,००० पावले चालल्यास – आठवड्याच्या शेवटी आपले फिटनेसचे उद्दिष्ट पूर्ण होते का हे आज आपण जाणून घेणार आहोत. तज्ज्ञ सांगतात की जी व्यक्ती दररोज ७,००० पावले चालण्याची सवय ठेवते, तसेच योग्य आहार आणि पुरेशी विश्रांती घेते, तिला हळूहळू चांगले आरोग्य फायदे मिळू शकतात.

डॉ. ऋतुजा उगाळमुळे (कन्सल्टंट फिजिशियन, वॉकहार्ट हॉस्पिटल्स, मुंबई सेंट्रल) म्हणाल्या की सलग दोन महिने दररोज ७,००० पावले चालल्यास आरोग्यावर नोटिसेबल परिणाम दिसू शकतात.

नियमित चालण्यामुळे रक्तातील साखरेवर नियंत्रण राहते, रक्तदाब कमी होतो आणि सांधे व स्नायूंचे आरोग्यही चांगले राहते. जरी १०,००० पावले आदर्श मानली जात असली, तरी अनेक लोकांसाठी ७,००० पावले (वीकेंड्स पकडून) हे प्रतिदिनाचं एक वास्तववादी आणि प्रभावी लक्ष्य आहे, असे डॉ. उगाळमुळे म्हणाल्या.

दररोज ५,००० पेक्षा कमी पावले चालणे ही एक निष्क्रिय जीवनशैली मानली जाते. जरी १०,००० पावले आदर्श मानली जात असली, तरी ७,००० पावले हा सुरुवातीसाठी चांगला पर्याय आहे, असे डॉ. एम. सुधाकर राव (कन्सल्टंट कार्डिओलॉजिस्ट, मणिपाल हॉस्पिटल, सर्जापूर रोड) यांनी सांगितले.

चालण्यामुळे जेवणानंतरची साखरेची पातळी कमी होते, असे डॉ. राव म्हणाले. हे इन्सुलिनच्या कार्यक्षमतेत सुधारणा करते. यामुळे सिस्टोलिक रक्तदाब सुमारे ५ मिमी आणि डायस्टोलिक रक्तदाब सुमारे ३ मिमीने कमी होतो. याशिवाय, एलडीएल म्हणजेच वाईट कोलेस्टेरॉलची पातळीही कमी होते आणि इतर जोखमीचे घटकही घटतात, असे डॉ. राव म्हणाले.डॉ. अनिकेत मुळे, कन्सल्टंट इंटरनल मेडिसिन, किम्स हॉस्पिटल, ठाणे, यांनी सांगितले की जो व्यक्ती सलग दोन महिने दररोज ७,००० पावले चालतो, त्याला मानसिक आरोग्यात सुधारणा होते, ज्यामुळे तणाव कमी होतो आणि झोपेची गुणवत्ता चांगली होते.

नियमित शारीरिक व्यायामामुळे शरीरातील कॅलरी जास्त परिणामकारकरित्या बर्न होतात आणि त्याचबरोबर सहनशक्ती वाढण्यास मदत होते. चालणे हे एक प्रभावी व्यायामाचे माध्यम आहे कारण ते शरीरावर सौम्य ताण देते आणि सर्व वयोगटातील लोक दीर्घकाळ यामध्ये सहभागी राहू शकतात, असे डॉ. मुळे म्हणाले.

कालांतराने ही सवय मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयविकार यांसारख्या दीर्घकालीन आजारांचा धोका लक्षणीयरीत्या कमी करू शकते, तसेच मानसिक आरोग्यासही चालना देते. नियमित चालणे हृदयासाठी फायदेशीर ठरते कारण ते वजन नियंत्रणात ठेवते आणि रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवते.

# २०६ हाडांतील ताकद कायमची गमवून शरीर होईल सांगाडा, डायबिटीजही होईल

व्हिटॅमिन बी १२ शरीरातील रक्तपेशी बनवण्यापासून हाडे व सांधे मजबूत ठेवण्यापर्यंत प्रत्येक गोष्टीत मदत करतं. जर ते कमी झालं आणि वेळीच लक्ष दिलं नाही तर भयंकर असे आजार होऊ शकतात. जाणून घ्या व्हिटॅमिन बी १२ कमी झाल्यावर दिसणारी लक्षणं, संकेत व उपाय.

आपण दररोज खूप गोष्टी खातो, पण आपल्या शरीराला काय लागतंय आणि काय मिळतंय याकडे फारसं लक्ष दिलं जात नाही. शरीरातील अनेक लहान–सहान वाटणारे बदल खरंतर काही महत्त्वाच्या पोषणतत्त्वांच्या कमतरतेचं संकेत देत असतात. त्यातलंच एक महत्त्वाचं पोषणतत्त्व म्हणजे विटामिन बी १२. विशेषतः शाकाहारी लोकांमध्ये याची कमतरता जास्त आढळते. तुम्हालाही थकवा, चक्कर, एकाग्रतेचा अभाव किंवा जीभेतील बदल जाणवत असतील, तर ही वेळ आहे विटामिन बी १२ कडे लक्ष देण्याची.

व्हिटॅमिन बी १२ हे पाण्यात विरघळणारे जीवनसत्व आहे जे शरीराच्या अनेक महत्त्वाच्या कार्यांसाठी आवश्यक आहे. ते मांस, मासे, अंडी, दूध यासारख्या प्राण्यांच्या उत्पादनांमध्ये आढळते, ते प्लांट बेस्ड पदार्थांमध्ये फार आढळत नाही. शरीर स्वतःहून व्हिटॅमिन बी १२ तयार करू शकत नसल्यामुळे ते डाएट किंवा सप्लीमेंट्समधूनच घ्यावे लागते.

**शरीरासाठी का गरजेचं आहे विटामिन बी १२ ?**

व्हिटॅमिन B 12 हे पाण्यात विद्राव्य (water-soluble) असून शरीरात अनेक महत्त्वाच्या क्रियांसाठी जबाबदार असतं. रेड ब्लड सेल्स तयार करणं, DNA चे निर्माण, नर्व्ह सिस्टीमचं संरक्षण, मेंदूचं कार्य सुधारणं, ऊर्जा निर्माण करणं, मूड चांगला ठेवणं, हाडे मजबूत ठेवणं आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवणं. हे सगळं या एका व्हिटॅमिनच्या मदतीने शक्य होतं. हे प्रामुख्याने मांस, मासे, अंडी, दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमधून मिळतं.'

**कमी झालं की शरीर देतं हे संकेत**

विटामिन बी १२ ची कमतरता अनेक वेळा हळूहळू दिसते पण ती लक्षात घ्यावी अशी असते. काही महत्त्वाचे लक्षणे म्हणजे :

नेहमी थकवा जाणवणं
चेहरा फिकट किंवा पिवळसर होणं
डोके दुखणं
चिडचिडेपणा किंवा मूड स्विंग
लक्ष न लागणं किंवा विसरभोळेपणा
जीभ सांगते तुमचं आरोग्य

व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता ही Glossitis नावाच्या अवस्थेला जन्म देऊ शकते, ज्यामध्ये जीभेवर लालसरपणा, सूज, चिकटसरपणा किंवा जळजळ होते. तोंडात वारंवार छाले होणे आणि जिभेला जळजळ किंवा वेदना जाणवणं हे लक्षणेही नजरेआड करू नये.


**ग्रामपंचायत केडगाव,ता.दौंड,जि.पुणे**

**B–१ पेपर नोटीस क्र.१ सन २०२५/२६**

ग्रामपंचायत केडगाव,ता.दौंड,जि.पुणे यांच्याकडुन खालील नमुद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पध्दतीने (दोन सीलबंद लिफाफा पध्दतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडुन मागविणेत येत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत केडगाव,ता.दौंड, जि.पुणे यांच्याकडुन दि.१२/०६/२०२५ ते दि.१९/०६/२०२५ या कालवधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दि.१२/०६/२०२५ ते दि. १९/०६/२०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील.सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | केडगाव कंजार भट वस्ती रस्ता करणे. | २०००००/– | दि. १२/०६/२०२५ ते दि. १९/०६/२०२५ | २३६/– | २०००/– |
| २ | खुटबाव रस्ता ते टेंगले वस्ती रस्त्या शेजारील विहिरी जवळ संरक्षक भिंत बांधणे. | ३६३२१०/– | | ५९०/– | ३६३२/– |
| ३ | खुटबाव रस्ता ते सूळ वस्ती रस्ता खडीकरण मुरमीकरण करणे. | १३१४४२/– | | २३६/– | १३१४/– |
| ४ | वार्ड क्र.३ शेलार वस्ती पारगाव रोड बंदिस्त गटर करणे. | २९९९४३/– | | २३६/– | २९९९/– |
| ५ | हंडाळ वस्ती सिमेंट रस्ता करणे. | ८९९५८०/– | | ५९०/– | ८९९६/– |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.१) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे.२) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत केडगाव PDCC बँक शाखा केडगाव खाते क्र.०२२००२५००००००१ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापुर्वी केलेल्या कामांचे काम पुर्णत्वाचे दाखले जोडावेत.४) इसारा रक्कम ग्रामपंचायत केडगाव ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा केडगाव खाते क्र.०२२००२५००००००१ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५)आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल.

सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत केडगाव यांनी राखुन ठेवला आहे.

सही/– ग्रामपंचायत अधिकारी | सही/– सरपंच

ग्रामपंचायत केडगाव,ता.दौंड,जि.पुणे



**– जाहिरात –**

मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामिण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत पथदर्शी शहरी अन्न पुरवठा साखळी (Urban Food Pilot) उपप्रकल्पांतर्गत रासायनिक अंशमुक्त बाजाराभिमूख पिक प्रात्यक्षिके व राज्याबाहेरील प्रशिक्षणासह अभ्यासदौरा इ. घटक राबविण्याकरिता संपादन प्रक्रिया करण्यात येत आहे. नोदंणीकृत पुरवठादाराकडुन महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://mahatenders.gov.in) ऑनलाईन पध्दतीने (E-TENDE R) दि. १६/०६/ २०२५ दुपारी ०२.०० वा. पासून ते दि. ०१/०७/२०२५ रोजी वेळ दुपारी ०३.०० वा. पर्यंत मागविण्यात येत आहेत. सदर निविदेबाबत सविस्तर माहिती स्मार्ट प्रकल्पाच्या www.smart-mh.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर निविदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाचे नाव | निविदा क्रमांक |
| --- | --- | --- |
| 1 | Request for Online Quotation for Implementing URBAN Outside State Exposure visit cum training 2025-26 | 2025_DO-WB_1188503_1 |
| 2 | Request for Online Quotation for Implementing Urban Food Pilot Project Demo for Kharip Rabbi Crops 2025-26 | 2025_DO-WB_1188501_1 |

निर्देशित जाहिराती संदर्भात बदल करण्याचे, रद्द करण्याचे अथवा इतर बाबींचे सर्व अधिकार प्रमुख, जिल्हा अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प तथा प्रकल्प संचालक आत्मा, पुणे यांनी राखुन ठेवलेले आहेत.

सही/–
नोडल अधिकारी,
जिल्हा अंमलबजावणी कक्ष,
स्मार्ट प्रकल्प, पुणे

कार्यालयाचा पत्ता – जिल्हा अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प,
डी. टी. सी. सेंटर, सहावा मजला,
कृषिभवन, म्हात्रे पुलाजवळ, एरंडवणे,
पुणे – ४११००४

विमाका / पुणे / जाहि / ५३ / २०२५ – २०२६

## कलाविश्व

### मी कोणाची चमचागिरी करणार नाही', सुनीताने गोविंदासोबतच्या भांडणाचं खरं कारण सांगितलं



अभिनेता गोविंदा आणि पत्नी सुनीता आहुजा हे बॉलिवूड कपल कायमच चर्चेत असतं. त्यांच्यातील वाद, प्रेम असो किंवा घटस्फोटाच्या बातम्या. आता सुनिता पुन्हा एकदा चर्चेत आली आहे ते तिने केलेल्या एका विधानामुळे. गोविंदा आता पडद्यापासून दूर असला तरी त्याची पत्नी प्रकाशझोतात राहते. ती सतत मुलाखती देत असते आणि तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल उघडपणे बोलत असते. आता सुनिताने खुलासा केला आहे की तिच्या पतीशी भांडणाचे एकमेव कारण म्हणजे तो काम करत नाही. तिने सांगितले की त्याच्या आजूबाजूला असे अनेक लोक आहेत जे त्याची दिशाभूल करतात. आणि ती जे सत्य बोलते, ते अभिनेत्याला आवडत नाही.

सुनीता आहुजाने एका मुलाखतीत सांगितलं की ती गोविंदाला वजन कमी करण्यास आणि चित्रपटांमध्ये काम करण्यास सांगते, पण तो तिचं ऐकत नाही. तिने सांगितले की, मी गोविंदाशी फक्त एकाच गोष्टीवर भांडते, मी त्याला सांगते, तू काम कर. त्याने मला ६ ते ७ वर्षांपूर्वी सांगितले होते की मी तुला सिल्वेस्टर स्टॅलोन कसे व्हायचे ते दाखवेन. कारण तो माझा आवडता आहे. मी म्हणाले होते की या जन्मात असे होणार नाही. पुढच्या जन्मात, मला तुला माझा नवरा म्हणून नको, तर माझा मुलगा म्हणून हवा आहे.'

सुनीता आहुजा म्हणाली, गोविंदा वजन कमी करत नाहीये आणि चित्रपट करत नाहीये. मी त्याला सांगते की तू एक दिग्गज अभिनेता आहेस. तुझ्यासारखा अभिनेता कधीच झाला नाही. तू तुझं आयुष्य उध्वस्त करत आहेस कारण तू ज्या चार लोकांसोबत बसला आहेस ते तुला चांगल्या गोष्टी शिकवत नाहीत. सगळेच तुला खोटं शिकवत आहेत. चांगल्या लोकांसोबत बस. त्याच्या आजूबाजूचे लोक त्याला हे सांगणार नाहीत. त्यांना गोविंदाकडून पैसे मिळतात. म्हणून ते त्याची प्रशंसा करतात.'

### खोकला सुरु व्हायचा, धाप लागायची...' लोकप्रिय अभिनेत्रीनं केलेला गंभीर आजाराचा सामना



प्रत्येक इंडस्ट्रीमध्ये असे काही कलाकार असतात, जे कितीही अडचणी आल्या तरी त्यावर मात करत काम करतात. १२-१२ तासांच्या शिफ्ट करून त्यांचं स्वत:च्या तब्येतीकडे दुर्लक्ष होतं. त्यामुळे त्यांना अनेक आजारांना सामोरं जावं लागतं. असंच एका मराठी अभिनेत्रीबरोबर झालं असून तिनं याबद्दल एका मुलाखतीदरम्यान भाष्य केलं आहे. 'पिंगा' मालिका फेम शाश्वती पिंपळीकरने तिच्या आजारपणाबद्दल भाष्य केलंय. वर्षभरापूर्वी अभिनेत्रीनं आजारपणाचा सामना केलेला. यामुळे तिनं 'मुरांबा' या मालिकेतून ब्रेकही घेतला होता. याबद्दल तिनं हंच मीडियाला दिलेल्या मुलाखतीमध्ये सांगितलं की, 'मुरांबा मालिकेत मी आरती ही भूमिका करत होते. ही मालिका करत असतानाच मला साधारण सर्दी-खोकला होतो तसं झालं होतं. पण मी त्याकडे दुर्लक्ष केलं. माझ्या भावाचं लग्न होतं, त्यामुळे सगळी धावपळ सुरू होती. त्यात माझी शूटिंगचीही धावपळ होती. तर दोन-तीन महिने झालेला सर्दी-खोकला जातच नाहीय हे माझ्या लक्षात आलं. माझं त्याकडे बऱ्यापैकी दुर्लक्ष झालं. त्यामुळे माझ्या फुफ्फुसांवर त्याचा परिणाम झाला होता. तुम्हाला खूप काळ सर्दी, खोकला राहिला तर त्याचा फुफ्फुसांच्या काम करण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. मुरांबा' मालिका सोडल्यानंतर माझी परिस्थिती अशी होती की, दोन-तीन पायऱ्या चढल्यानंतरही मला थांबावं लागायचं. याबद्दल माझ्या खूप उशिरा लक्षात आल्यानंतर मी माझ्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ब्रेक घेण्याचा निर्णय घेतला.' 'त्यादरम्यान मला अनेक शोसाठी ऑफर आल्या होत्या. कारण लोकांना याबद्दल माहिती नव्हतं. मला नाटक आणि चित्रपटांसाठी विचारण्यात आलेलं. पण मी ठरवून सगळ्याला नाही म्हटलं

# मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पर्यायी मार्गांचे रुंदीकरण, दुरुस्ती करुन तातडीची उपाययोजना

## - उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत निर्णय



**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावर इंदापूर आणि माणगाव बायपास रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत प्रवाशांची वाहतूक कोंडीतून सुटका होणे आवश्यक आहे. त्यासाठी मोरबा रोड ते मुंबई-गोवा हायवे रस्ता, साईनगर कालवा ब्रिज ते उत्तेखोल कालवा गावापर्यंतचा रस्ता आणि निजामपूर रोड कालवा ते भादाव रस्ता हे माणगाव नगरपंचायत हद्दीतील तीन रस्ते आणि मुंबई - गोवा महामार्गावरील इंदापूर कॅनल रस्ता ते विगवली फाटा रस्ता, अशा चारही रस्त्यांच्या कामांसाठी आवश्यक १५ कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्यात येईल. ही कामे पूर्णत्वास नेण्याची कार्यवाही तातडीने करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्ग इंदापूर बायपास,माणगाव बायपास रस्त्यांच्या कामासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार,नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव (बांधकामे) संजय दशपुते, कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे, रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल, यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग विभाग, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

१८ मे रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रायगड जिल्ह्यातील या महामार्गाच्या कामाची हवाई व प्रत्यक्ष पाहणी केली होती. त्यावेळी त्यांनी आश्वासन दिल्यानुसार, आज मंत्रालयात ही बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी माणगाव, इंदापूर येथील वाहतूककोंडी, पर्यायी मार्ग याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. ज्या कामांसाठी राष्ट्रीय महामार्गतर्फे निधी उपलब्ध होऊ शकत नाही,त्यासाठी राज्य शासन निधी उपलब्ध करून देईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आश्वस्त केले.

## आशिया खंडातील पहिले सागरी संग्रहालय, गुलदार युद्धनौकेच्या प्रकल्पाने सिंधुदुर्गचे नाव जगाच्या पर्यटन नकाशावर

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मालवण : सिंधुदुर्गच्या दृष्टीने सुवर्णाक्षरांनी आजचा दिवस लिहिला गेला आहे. सिंधुदुर्ग जिल्हा महाराष्ट्रातील एकमेव पर्यटन जिल्हा घोषित झाल्यानंतर घडलेल्या आजवरच्या अनेक स्थित्यंतरांमधील गुलदार युद्धनौकेच्या प्रकल्पाने सिंधुदुर्गचे नाव जगाच्या पर्यटन नकाशावर ठळकपणे नोंदविले गेले आहे. त्याचप्रमाणे हा उपक्रम लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस'मध्ये नोंदविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

निवृत्त युद्धनौका गुलदारची उंची २२ मीटर, लांबी ८३.९ मीटर, वजन ११२० टन, मूळ देश पोलंड येथून खरेदी केली आहे.

ही कुंभीर वर्गाची उतरणी युद्धनौका आहे. नौदलाची चार दशक सेवा बजावून आता तिच्या पुढच्या प्रवासासाठी सज्ज होत आहे. युद्धनौकेच्या या संपूर्ण



संग्रहालयाच्या प्रक्रियेमध्ये एकूण पाच टप्पे येतात, यातील पहिला टप्पा नौदलाकडून युद्धनौकेचे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे झालेले हस्तांतरण अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने २१ फेब्रुवारी २०२५ रोजी गुलदारचे नौदलाकडून हस्तांतरण करण्यात आले.

प्रकल्पाचा दुसरा टप्पा म्हणजे युद्ध नौकेचे सिंधुदुर्गात झालेले आगमन. इंजिन नसलेल्या युद्धनौकेला टग बोटिच्या सहाय्याने खेचून विजयदुर्गाच्या समुद्रकिनाऱ्यावर आणून स्थिर करण्यात आले. यानंतर तिसऱ्या टप्प्याची सुरुवात होते ती म्हणजे युद्धनौकेच्या पोटात असलेल्या सर्व पर्यावरणासाठी हानिकारक घटकांची स्वच्छता आणि चौथ्या टप्प्यामध्ये युद्धनौकेला तयार करण्यात आले. चौथ्या टप्प्यामध्ये ही नौका २० ते २२ मीटर खोल सागरतळाशी विराजमान होणार आहे.

गुलदार नौका तिच्या धडाडीच्या व कार्यक्षमतेच्या आठवणींसह आता ती पर्यटकांना, अभ्यासकांना व साहसी जलप्रेमींना भेटण्यासाठी सज्ज होत आहे. या संग्रहालयाचे दर्शन तितकेच खास असणार आहे. स्कुबा डायव्हिंग आणि पाणबुडीच्या साहाय्याने पर्यटक बेट सागर तळाशी जाऊन या युद्धनौकेचा अनुभव घेणार आहेत.

## कात्रज कोंढवा रस्त्याचे काम हिवाळी अधिवेशनापूर्वी पूर्ण करावे : सभापती प्रा.राम शिंदे

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : पुणे शहरातील कात्रज कोंढवा रस्त्याच्या कामासाठी राज्य शासनाने १४० कोटी रुपये उपलब्ध करुन दिल्यानंतर देखील वर्षभरात सदर काम झाले नाही, हिवाळी अधिवेशनापूर्वी हे काम पूर्ण करावे आणि कामाच्या विलंबास दोषी असणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करावी, असे निर्देश सभापती प्रा.राम शिंदे यांनी दिले.

विधानपरिषदेचे सदस्य योगेश टिळेकर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात ७ मार्च, २०२५ रोजी विशेष उल्लेखाद्वारे हा प्रश्न उपस्थित केला होता. यासंदर्भात बैठक घेण्यात आली, त्यावेळी हे निर्देश देण्यात आले.

या बैठकीस विधानपरिषदेचे सदस्य योगेश टिळेकर, विधानमंडळाचे सचिव (३)



डॉ.विलास आठवले, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम (दूरदृष्य प्रणालीद्वारे), अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उप सचिव नगरविकास श्रीमती प्रियंका छापवाले उपस्थित होते.

सन २०१८ मध्ये कात्रज कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम मंजूर झाले आहे, मागील सात वर्षात हे काम पूर्ण झालेले नाही. यामुळे भूसंपादनाच्या खर्चात वाढ झाली आहे. शासनाकडे मागणी केलेल्या निधीपैकी १४० कोटी रुपये एक वर्षापूर्वी प्राप्त झाले आहेत परंतु भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली नाही.

निधी मिळून सुद्धा विनियोग न होणे ही बाब गंभीर असून दोषींवर कारवाई प्रस्तावित करावी आणि हे काम हिवाळी अधिवेशनापूर्वी पूर्ण करुन अहवाल सादर करावा, असे निर्देश सभापती प्रा.राम शिंदे यांनी दिले.

## पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वाहनांची तांत्रिक तपासणी करुन घेण्याचे आवाहन

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : श्री संत ज्ञानेश्वर महाराज व जगदगुरु संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या सर्व वाहनांची संबंधित वाहनचालकांनी १९ जून २०२५ पर्यंत तांत्रिक तपासणी करुन घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

पालखी सोहळ्यावेळी देहू, आळंदी ते पंढरपूर या दरम्यान पालखी मार्गावर प्रवासी तसेच जड वाहने मोठ्या प्रमाणात सहभागी होतात.

या वाहनांतील तांत्रिक दोषांमुळे अपघात होऊ नयेत, वाहने रस्त्यात बंद पडून वाहतुकीस अडथळा होऊ नये यासाठीची उपाययोजना म्हणून वाहनचालकांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे आळंदी रोड चाचणी मैदान व दिवे येथील टेस्ट ट्रॅक येथे कार्यालयीन वेळेत वाहनांची तांत्रिक तपासणी करुन घ्यावी.

वाहन तपासणीवेळी वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र, कर, विमा प्रमाणपत्र, योग्यता प्रमाणपत्र व वायू प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र, अनुज्ञप्ती व वाहतूक परवाना मुदतीत असल्याबाबतचे सर्व कागदपत्रे सोबत घेवून जावे. ही तपासणी विनामूल्य असून वाहन तपासणी केल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वाहनचालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत प्रसिद्धी पत्रकान्वये करण्यात येत आहे.

## रुग्णालयांनी अवैध व अनावश्यक गर्भाशय शस्त्रक्रिया केल्यास गय केली जाणार नाही : आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : अनावश्यक गर्भाशय शस्त्रक्रिया रोखण्यासाठी गर्भलिंग चिकित्सा व निदान च्या दक्षता समितीमार्फत नियंत्रण ठेवले जाणार असून, महिलांच्या अवैध व अनावश्यक गर्भाशय शस्त्रक्रिया करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. असे प्रतिपादन मा.आरोग्य मंत्री नामदार प्रकाश आबिटकर यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यातील काही रुग्णालयात महिला ऊसतोड कामगारांच्या अवैध व अनावश्यक गर्भ पिशव्या काढल्या जात असल्या बाबतची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली



होती. त्या अनुषंगाने विधानपरिषद सदस्या श्रीमती.

चित्रा वाघ यांनी बैठकीची मागणी केली होती. बीडमधील या प्रश्नाची आरोग्य मंत्र्यांनी गंभीर दखल घेऊन त्यांचे मंत्रालयीन दालनात बैठक आयोजित केली होती.

या बैठकीला आरोग्य राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, विधानपरिषद सदस्य श्रीमती चित्रा किशोर वाघ यांचेसह सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त अमगोथू श्री रंगा नायक, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, संचालक डॉ. विजय कंदेवाड, यांचेसह आरोग्य विभागातील प्रमुख अधिकारी दुरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीला उपस्थित होते.

ऊसतोड महिला कामगारांच्या गर्भाशय शस्त्रक्रियेचा विषय अत्यंत संवेदनशील व गंभीर असुन, शासनाने घालून दिलेल्या कार्यपद्धतीनुसारच शस्त्रक्रिया होतील याबाबत दक्ष राहण्याचे आदेश आरोग्यमंत्र्यांनी यावेळी दिले. तसेच अवैध गर्भ पिशव्या काढल्याच्या तक्रारीचे सनियंत्रण करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्याबाबत निर्देश दिले आहेत. अनावश्यक गर्भाशय शस्त्रक्रियेनंतर महिलांना होणाऱ्या दुष्परिणामा बद्दल समाजात व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना यावेळी मंत्री महोदय यांनी दिल्या. महिलांच्या आरोग्याच्या बाबतची कोणतीही चुकीची बाब खपवून घेतली जाणार नसल्याचे यावेळी आरोग्य मंत्री यांनी सांगितले.

## पेरण्यांची घाई नको; पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : राज्यात पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषि विभागाने केले आहे. तर राज्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, शेतकरी, मच्छिमार बांधवांनी दक्षता घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज पाऊस, पीक पाणी, धरणाच्या जलाशयातील पाणी साठा आदीचा आढावा घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या बैठकीत कृषि विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी राज्यातील पीक पाणी, पेरण्या खते पुरवठा याबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली. त्यांनी सांगितले की, राज्यातील सर्व भागात पंधरा जून मोसमी पाऊस सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये. पंधरा जून नंतरच पावसानंतर



मार्गक्रमण होण्यासाठी सक्रिय वातावरण निर्मिती होण्याची शक्यता आहे. राज्यातील सतरा जिल्ह्यात पंचवीस टक्के पेक्षा कमी, बारा जिल्ह्यात पंचवीस ते पन्नास टक्के, चार जिल्ह्यांत पन्नास ते पंच्याहत्तर टक्के तर एका जिल्ह्यात शंभर टक्के हून अधिक पाऊस झाला आहे. राज्यातील विविध विभागांत खते आणि बियाणे यांचा सुरळीत पुरवठा झाला आहे. अनेक भागात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

मोसमी पाऊस येत्या तीन ते चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे. दक्षिण व्दीपकल्पीय भारताच्या भूभागातील कर्नाटकात १२ ते १५ जून दरम्यान आणि कोकण आणि गोवा येथे १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, अशी माहिती वेधशाळेच्या संचालक शुभांगी भुते यांनी सादरीकरणाद्वारे दिली. त्यांनी सांगितले की, मोसमी पावसाच्या मार्गक्रमणासाठी अनुकूल वातावरण निर्मिती होण्याची शक्यता येत्या तीन ते चार दिवसांत आहे. त्यानुसार मध्य महाराष्ट्रात १२ जून रोजी मराठवाड्यातील काही भागात १२ ते १४ जून दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण, गोवा येथे १२ आणि १५ जून दरम्यान मुसळधार तर १३, १४ जून रोजी अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या कालावधीत मच्छिमारांनी समुद्रात मासेमारी करण्यासाठी जाऊ नये. वीजांच्या गडगडाटांसह वादळ होत असताना खुल्या मैदानावर काम करु नये, वीजा होताना झाडांच्या खाली आसरा घेऊ नये, इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वीज पुरवठा खंडित करुन ठेवावा, ओढा, तलाव, नदी आदी पाण्याच्या स्त्रोतातून तत्काळ बाहेर पडावे, वीज वहन करणाऱ्या सर्व वस्तूंपासून दूर राहावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. राज्यातील सर्व प्रमुख धरणात गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाणीसाठा असल्याचे आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत सांगण्यात आले. जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी माहिती दिली. धरणाचे नाव, सध्याचा पाणी साठा, गेल्या वर्षीचा साठा - गोसीखुर्द ४.६४ टीएमसी (८.६७), तोतलाडोह १८.७९ (१८.१४), ऊर्ध्व वर्धा ८.८५ (८.८७), जायकवाडी २२.६०(२.९९), मांजरा १.६३(0.00), ऊर्ध्व तापी हातनूर ५.३२(२.६३), गंगापूर २.५०(२.४८), कोयना १७.३६(१०.००), खडकवासला०.८४(१.०३), उजनी १८.७२(0.00), भातसा ९.९५(८.१७), धामणी ३.११(१.७७).




□ संपादक - संजय प्रल्हाद भोकरे □ सरव्यवस्थापक - सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन - ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com